# आजचा सुधारक

विवेकवादी चिंतनाला वाहिलेले मराठी मासिक

वर्ष 26 अंक 4 जुलै 2015

या अंकात


2 प्रतिकार हे कोतेपणाचे लक्षण नसते .................. *ध. रा. गाडगीळ*

2 जातीय अत्याचारः प्रतिबंध आणि निर्मूलन........... *गौतमीपुत्र कांबळे*

10 रवींद्रनाथ टागोर आणि राष्ट्रवाद...................... *डॉ.सुरेश खैरनार*

15 विलास आणि विकास................................*कुमार केतकर*

17 ‘केस तर केस - भीमजयंतीला वाजणार २४ बेस’...... *सुरेश सावंत*

21 जमिनीची किंमत 'मोजणार' कशी?.........................*मिलिंद मुरुगकर*

24 धोरणशून्य ‘स्मार्ट’पणा काय कामाचा?..................*अभय टिळक*

26 स्वप्रतिमेच्या प्रेमात काही थोर भारतीय............... *रामचंद्र गुहा*

29 अंधश्रद्धेचं जोखड उतरवायचं हाय!.................. *शर्मिला कलगुटकर*

33 अस्वस्थ नाट्यकर्मीचे प्रगल्भ चिंतन.................. *उदय कुलकर्णी*

35 जुने ते सोने (?)..................................*भालचन्द्र काळीकर*



संस्थापक – संपादक

**दि. य. देशपांडे**

(1918-2006)

कार्यकारी संपादक

**प्रभाकर नानावटी**



**संपर्कः**

प्रभाकर नानावटी pkn.ans@gmail.com 9503334895

भरत मोहनी bharat_i@yahoo.com 9822736808

aajacha.sudharak@gmail.com


www.aajachasudharak.in

# प्रतिकार हे कोतेपणाचे लक्षण नसते!

..आज प्रत्यक्ष हिंदू समाजात सर्वच प्रकारच्या भिन्नत्वाच्या कल्पना प्रभावी आहेत. जातीबद्दलची उच्चनीचत्वाची भावना आहे. पोटजातीबद्दलचा अभिमान आहे व त्याबरोबरच प्रादेशिक व भाषिक भिन्नत्वाच्या कल्पनांचा पूर्ण पगडा आहे.. जोवर प्रत्येक पंथ, जात, गट आपापले वैशिष्ट्य निराळे मानतो व त्याप्रमाणे वागतो तोवर भारतीयतेचा कितीही डांगोरा पिटला, तरी आमचा समाज अनेकविध विभागलेला आणि म्हणून दुर्बळ राहणार. तसेच राष्ट्राभिमानाचा अतिरेक व दुष्परिणाम होतात ते राष्ट्रनिष्ठा या एकाच कल्पनेस फाजील महत्त्व दिल्यामुळे.

व्यक्ती, कुटुंब, गाव, प्रदेश, राष्ट्र, खंड, जग ही एक श्रेणी मानता येईल. या श्रेणीतील प्रत्येक घटकाबाबत व्यक्तीचे विशिष्ट कर्तव्य असते. सर्वांची अधिकारक्षेत्रे प्राय: एकमेकांपासून विभिन्न, निराळी. जोवर एकाचे दुसऱ्यावर अतिक्रमण होत नाही तोवर एकमेकांत विरोध उत्पन्न होण्याचे काही कारण नाही. यांतील कोणत्याही एकाचे स्थान इतरांहून विशेष श्रेष्ठ व निष्ठा बाळगावयाची ती त्या बाबतचीच असे म्हटल्याने अतिरेक होतो व बेबंदशाही अगर हुकूमशाही, अराजक किंवा केवळ दंडनीती या कुठल्यातरी टोकाकडे समाज साहजिकच झुकतो. गाव व प्रदेश यांनी राष्ट्रास न मानले तर बेबंदशाही माजेल. उलट राष्ट्राभिमान, देशाची एकता या गोष्टी महत्त्वाच्या असल्या तरी राष्ट्राच्या सरकारने कुटुंब, गाव अगर प्रदेश यांच्या योग्य हक्कांवर अतिक्रमण केले, यांपैकी कोणास अन्यायाने वागविले तर ते, गाव-प्रदेशाहून राष्ट्र मोठे, म्हणून निमूटपणे सहन केले पाहिजे असे नाही; किंबहुना समाजाचा समतोल राखण्याकरिता अशा अतिक्रमणाचा योग्य प्रकारे प्रतिकार करणे हे कर्तव्यच ठरते. असला प्रतिकार कोतेपणाचे लक्षण नसून खऱ्या अर्थाने राष्ट्रहित साधणाराच आहे.

*ध. रा. गाडगीळ*

●●●

# जातीय अत्याचारः प्रतिबंध आणि निर्मूलन

*गौतमीपुत्र कांबळे*

जात-धर्म चळवळ समाजकारण

हा विषय केवळ बौद्धिक चर्चेचा किंवा सैद्धांतिक मांडणीचा नाही. तर तो जातीय अत्याचाराच्या मूळ कारणांचा आणि निमित्त कारणांचा शोध घेऊन त्या दोन्ही कारणांचे निर्मूलन तात्त्विक आणि थेट वर्तनव्यवहार करण्याच्या प्रामाणिक प्रयत्नाशी निगडित आहे. जातीय अत्याचार निर्मूलनाची जाती निर्मूलन ही पूर्व अट आहे. महाराष्ट्रामध्ये जातीय अत्याचार दिवसेंदिवस केवळ वाढताहेत नव्हे, तर त्याची भीषणता आणि क्रूरताही वाढत चालली आहे. प्रशासनाची तांत्रिकतेच्या नावाखाली चाललेली निष्क्रियता, लोक प्रतिनिधींची आणि इतर समूहांची उदासीनता, स्थानिक राजकीय किंवा अराजकीय नेत्यांचा प्रत्यक्ष – अप्रत्यक्षपणे गुन्हेगारांच्या बचावासाठी होत असलेला हस्तक्षेप, चळवळी/आंदोलनाप्रति समाज-शासनस्तरावरील अस्वस्थ करणारा बेदखलपणा, यामुळे जातीय अत्याचार

करणाऱ्या गुन्हेगारांचं वाढत चाललेलं बळ. परिणामतः कितीही क्रूर आणि अमानुष जातीय अत्याचार होत असले तरी ते आता गृहित धरल्यासारखे किंवा सवयीचे होत चालले आहेत. आणि ही बाब तात्कालिक कोणालाही कशीही वाटत असली तरी उद्याचे भयंकर चित्र नजरेसमोर आणता आजचे बरे म्हणण्याची वेळ यायला फार काळ वाट पहावी लागणार नाही.

फुले-आंबेडकरी आणि तत्सम चळवळीच्या माध्यमातून काहीही करून काहीच परिणाम होताना दिसत नाही. त्यामुळे चळवली सैरभैर झाल्यासारख्या वाटताहेत. तरीही एकेकट्या पक्ष/संघटना किंवा काही पक्ष/संघटना एकत्रित घेऊन जातीय अत्याचाराविरुद्ध लढताहेत. आणि त्याचवेळी सर्वांनी एकत्रित येऊन लढावं असं आवाहनही करताहेत. कदाचित कर्तव्याबरोबर आपल्यापुरता का असेना अपराध जाणिवेतून मुक्त होण्याचा मार्ग शोधताहेत. वास्तविक राष्ट्रा-राष्ट्रांमधल्या, धार्मिक दंगलीमध्ये होणाऱ्या हिंसाचारापेक्षा आणि नक्षलवाद्याकडून होणाऱ्या हिंसाचारापेक्षाही जातीय हिंसाचाराचे स्वरूप हे अधिक अमानुष आणि गंभीर आहे. तर दुसऱ्या बाजूला राष्ट्रा-राष्ट्रांमधल्या युद्धामध्ये लढण्यापेक्षा, धार्मिक दंगली निवारण्याच्या प्रयत्नापेक्षा नक्षलवाद्याविरुद्धच्या लढ्यापेक्षा इतकेच नव्हे तर नक्षलवादी ज्या उद्देशासाठी लढताहेत त्या लढ्यापेक्षाही जातीय अत्याचार निर्मूलनाची लढाई अवघड आहे आणि तरीही आपल्या सगळ्यांच्या अस्तित्वासाठी अपरिहार्य आहे. ही लढाई स्वराज्याच्या लढाईपेक्षाही महत्त्वाची आणि अवघड असल्याचे स्पष्ट करताना डॉ बाबासाहेब आंबेडकर Annihilation of Caste मध्ये म्हणतात, 'स्वराज्यासाठी केलेल्या लढाईत संपूर्ण राष्ट्र तुमच्या बाजूने लढत असते. जातिविरूध्दच्या लढाईत मात्र तुम्हाला संपूर्ण राष्ट्राशी लढा द्यावा लागतो. परंतु हे कार्य स्वराज्यापेक्षाही अधिक महत्वाचे आहे.' परंतु ही इतकी महत्वाची लढाई आजही एकाकीपणे लढली जात आहे. यामध्ये अत्यंत चुकीचे एक गृहीतक म्हणजे जातिनिर्मूलनाची समस्या आणि त्यासाठीची लढाई ही केवळ मागास मानलेल्या समूहांचीच आहे. आणि या समूहातील चळवळी आणि लोकही आता हळूहळू अगतिकतेकडे वळू लागलेत. परंतु टोकाची अगतिकता अराजकतेला आग्रहाचं निमंत्रण देत असते आणि अराजकतेच्या हाताला पकडून हिंसाचार येत असतो. म्हणून अगतिकतेचं टोक गाठण्यापूर्वी आणि अराजकतेनं निमंत्रण स्वीकारण्यापूर्वी जातीय अत्याचार (जातिनिर्मूलनाची) ही राष्ट्रीय समस्या मानून तिचे तत्काळ निराकरण केले पाहीजे.

जातीय अत्याचाराचं मूळ कारण इथली जातव्यवस्था. ही जन्माधिष्ठित, विषमताधिष्ठित आणि श्रेणीबद्ध आहे. जोपर्यंत ही जातीव्यवस्था आहे, तोपर्यंत जातीय अत्याचार होत राहणार आणि जातिव्यवस्था टिकवून ठेवणारे तात्त्विक, धार्मिक, मानसिक भक्कम आधार आहेत तोपर्यंत जातिव्यवस्थाही टिकून राहणार! शिवाय आजचे भारतीय समाजाचे जातवास्तव हे 'रचनात्मक हिंसा' ( structural violence ) निर्माण करणारे आहे. म्हणजे असे की, इथे प्रत्येक व्यक्ती वा समूहाने आपापल्या जातीनुसार वर्तन केले तरी दुसऱ्या कोणत्या तरी जातीच्या व्यक्तीवर किंवा समूहावर अत्याचार होतोच. म्हणजे तेथे जातीय अत्याचार करावे लागत नाहीत जातीवर्तनाद्वारे होतातच. मग शाब्दिक मानहानी असो वा शरीराचे तुकडे करणे असो! शिवाय उच्च जातीचे लोक जेव्हा खालच्या जातीच्या लोकांचे खून करतात तेव्हा त्या खुनी लोकांचे म्हणणे एवढेच असते की, सदरचे खून आम्ही आमच्या जन्माधिष्ठित जातीय प्रतिष्ठेच्या रक्षणासाठी केलेत. त्यात चुकीचे काय? असा त्यांचा येथील कायद्याला आणि न्यायव्यवस्थेलाही आव्हानात्मक उलटा प्रश्न आहे. म्हणून यासंदर्भात Annihilation of Caste मध्ये जे डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, हे थोड्या तपशीलाने देतो.

- 'त्याचबरोबर हेही मान्य करावे लागेल की, हिंदू हे अमानुष किंवा बुद्धीहीन आहेत म्हणून नव्हे तर ते अत्यंत धार्मिक आहेत म्हणून जातीचे पालन करतात. म्हणून जातीचे पालन करण्यात लोकांची चूक नाही, तर ज्या धर्माने जातीची कल्पना त्यांच्यात बिंबवली, त्या धर्मात चूक आहेः
- हे जर बरोबर असेल तर तुम्हाला ज्यांच्याशी सामना करायला आहे तो शत्रू म्हणजे जातीचे पालन करणारे लोक नसून त्यांना जातीचा धर्म शिकविणारे धर्मशास्त्र आहेः
- लोकांचे हे वर्तन म्हणजे त्यांच्यावर धर्मशास्त्रानी बिंबवलेल्या श्रद्धांचा परिपाक आहे.
- अशा धर्मशास्त्रांच्या पावित्र्यावर श्रद्धा ठेवण्याचे जोपर्यंत थांबवले जात नाही तोपर्यंत त्यांच्या वर्तनात बदल होणार नाही. असे म्हणून पुढे ते आवाहन करतात की, 'बुद्ध, गुरूनानकाप्रमाणे धर्मशास्त्राचे प्रामाण्य नाकारले पाहिजे. हिंदूना त्यांच्यात जे काही वाईट आहे तो त्यांचा धर्म आहे आणि धर्मानेच जातीच्या पावित्र्याची कल्पना जन्मास घातली आहे, हे सांगण्याचे धैर्य तुम्ही दाखवता काय?'

यावर काही हुशार लोक बारीकशी शंका काढतील की, आता कुठे राहिला आहे धर्म? आणि धर्मशास्त्र? आज कोणी धर्मशास्त्र वाचून जातीय अत्याचार करताहेत काय? आजचे अत्याचार हे जातीय नसून भांडवली व्यवस्थेने निर्माण केलेला धनिक वर्गच अत्याचार करीत असतो. म्हणजे त्यांच्या मते हे अत्याचार जातीय नसून वर्गीय आहेत. परंतु वास्तव तसे नाही. गेल्या दहा वर्षातल्या महाराष्ट्रातल्या अत्याचारांची जरी पाहणी केली तरी मागासलेला मानलेल्या जातसमूहातील धनिक झालेल्या किती लोकांना वरिष्ठ मानल्या गेलेल्या जातीतील गरीब असलेल्या किती लोकांवर अत्याचार केलेत? खरं तर अनुभव याउलट आहे. म्हणजे मागासलेल्या मानलेल्या आणि ज्यांची आर्थिक स्थिती सुधारलेली आहे, अशांच्यावर वरिष्ठ मानला गेलेल्या समूहातील गरीब असलेल्यांनी अत्याचार केलेले आहेत. आणि आज कुणाला धर्मशास्त्रे वाचून अन्याय करायची गरज नाही. जातीय अहंगंड आणि न्यूनगंडही सामूहिक अबोधावस्थेमुळे पिढ्यानपिढ्या चालत येत असतोच. निदान आपल्याकडे तरी! याही संदर्भात डा.बाबासाहेब आंबेडकरांनी Annihilation of Caste मध्ये उदाहरण दिले आहेः

*'जातिव्यवस्थेचे जे दुसरे वैशिष्ट्य आहे, ते जास्त घृणास्पद आहे. आजच्या इंग्रजांचे पूर्वज हे इंग्लंडच्या गृहयुद्धात ( रोझेस व क्रॉमवेल युद्धात ) या ना त्या बाजूने लढले होते. परंतु आजचे त्यांचे वंशज तत्कालीन पूर्वजांच्या शत्रूंच्या वंशजाबद्दल शत्रुत्वाची भावना मुळीच मनात धरत नाहीत. आपले मतभेद ते पूर्णपणे विसरून गेलेत. परंतु आजचे ब्राह्मणेतर ब्राह्मणांना त्यांच्या पूर्वजांनी शिवाजी महाराजांना दिलेल्या अपमानास्पद वागणुकीबद्दल आजही माफ करायला तयार नाहीत.'*

याचा अर्थ स्पष्ट आहे की जातीय अत्याचार करण्यासाठी आज पुन्हा धर्मशास्त्रे वाचण्याची गरज नाही.

यातील मूळ मुद्दा हा भारतीय समाज वास्तव जातीय की वर्गीय? या आकलनातील भेदाशी संबंधित असल्याने त्यासंबंधी आणखी विश्लेषण करणे आवश्यक आहे. जात हे भौतिक ( प्राधान्याने आर्थिक ) वास्तव असल्याचा त्यांचा दावा मान्य केला तर इथलं सगळं भौतिक (आर्थिकतेला प्राधान्य देणारं) वास्तव जातीय ठरतं पण हे ते मान्य करतील, असं वाटत नाही. आणि जर मान्य केलं तर मग इथलं भौतिक वास्तव बदलायचं असेल तर जातवास्तव बदलावं

लागणार! अगदी सोपं करून सांगायचं तर इथल्या आर्थिक विषमतेच्या निर्मूलनासाठी प्रथम जातिनिर्मूलन आवश्यक ठरते. आणि 'पेच' येथेच आहे. शिवाय डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी Annihilation of Caste मध्ये म्हटले आहे की-

*'जात ही विटाच्या भिंतीप्रमाणे किंवा परिवेष्टित तारेप्रमाणे एखादी भौतिक वस्तू नाही. ही एक कल्पना आहे, मनाची एक स्थिती आहे. त्यामुळे जातीचा नाश याचा अर्थ भौतिक अडथळ्यांचा नाश नव्हे, तर त्याचा अर्थ मनोवृत्तीतील बदल होय.'*

मात्र येथे एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की, मानसिक म्हणजे अध्यात्मिक नव्हे.

मुळात जात = वर्ग मानल्यामुळे जातिनिर्मूलनाच्या प्रयत्नालाच मर्यादा पडतात .साहजिकच परिणामालाही! असे का आणि कसे घडले? त्याचा एक पैलू असा की, 'भारतातील जाती - तिची रचना, उत्पत्ती आणि विकास' या निबंधातील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे एक विधान असे की, 'जात म्हणजे बंदिस्त वर्ग' हे विधान डाव्या चळवळीला पूरक वाटल्याने त्या चळवळीशी जवळीक असलेल्या किंवा त्या चळवळीतच असलेल्या काही अभ्यासकांना फारच महत्वाचे वाटले आणि 'सापडले ! सापडले!! ' म्हणून त्यांनी आर्किमिडिजसारखा आनंदोत्सवही साजरा केला. मग असलेच अनेक संदर्भ अभ्यासकांनी आपल्या सोयीनीं शोधून काढले. आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे कसे मार्क्सवादी होते ते सिद्ध करण्याचा प्रयत्नही सुरु झाला. यावर अनेकदा चर्चाही झाल्यात. तो विषयही मोठा असल्याने येथे तपशीलवार चर्चा करणे शक्य नाही. पण एक गोष्ट मांडली पाहिजे की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी वापरलेली वर्ग ही संकल्पना डाव्या चळवळीला अभिप्रेत असलेल्या वर्ग या संकल्पनेच्या अर्थाहून भिन्न आहे. शिवाय जात = वर्ग मानला तर भारतात सुमारे ६५०० हून अधिक जाती आहेत मग तेवढे वर्गही मानले तर डाव्या चळवळीला अभिप्रेत असलेला वर्ग संघर्ष कसा करणार? आणि कोणत्या वर्गाची ( म्हणजे जातीची ) सत्ता आणणार!

या गोंधळातून बाहेर पडण्यासाठी वास्तव म्हणून हे मान्य केलं पाहिजे की, आणि तेही जातीय अत्याचाराच्या सदंर्भात 'येथे मानवी वर्तनाच्या प्रेरक आणि नियंत्रक या वर्गीय जाणीवा + नेणीवा नसून जातीय जाणीवा + नेणीवा आहेत. मग डाव्या चळवळीतील अभ्यासकांची अशी फसगत का झाली?' याचे उत्तर आपणास आनंद तेलतुंबडे यांच्या Anti Imperisalism and Annihilation of Caste मध्ये मिळते. ते म्हणतात, '...देशात क्रांती घडवून श्रमिकांचे शासन ( सर्वहारांचे राज्य ) आणू पाहणाऱ्या मार्क्सवादी चळवळीने देशातील एकूण लोकसंख्येच्या एक चतुर्थांश एवढी मोठी संख्या असलेल्या एतद्देशीय पारंपरिक सर्वहारांच्या ( दलिताच्या ) दु:स्थितीकडे मात्र दुर्लक्षच करणे पसंत केले. व क्रांतिकारी सोवळेपणाने केवळ सैध्दांतिक अशा सर्वहाराला संघटित करण्यासाठी धडपडत राहिले, जो वास्तविकत: अस्तित्वातच नव्हता. यात विरोधाभास असा की, द्वंद्वात्मक भौतिकवादाशी शपथेवर बांधिलकी सांगताना ते तत्त्वग्राही यांत्रिकी पध्दतीने युरोपीय साच्यातून भारतीय समाजाला पाहत कल्पनारम्य वर्गांना शोधत राहिले.'

एक गोष्ट अशंत: मान्य की, काही जातीतील काही व्यक्ती-कुटुंबांचा आर्थिक स्तर किंचित वरच्या बाजूला गेला असेल त्यामुळे फार तर जातीत आर्थिक निकषाधारे स्तरीकरण झाले म्हणता येईल पण त्याला 'वर्ग' म्हणता येणार नाही; शिवाय हे स्तरीकरणही जातिग्रस्त आहे. अशीच आणखी एक गफलत झालीय किंवा केलीय ती म्हणजे हिंदु धर्माला 'ब्राह्मणी धर्म' संबोधून ! अर्थात वैदिक, ब्राह्मणी, हिंदू अशा साखळीची ऐतिहासिक संगती लावणे वगैरे गोष्टी हा संशोधनाचा आणि अभ्यासाचा विषय होऊ शकतो. परंतु चळवळीसाठी किती सुसंगत किंवा विसंगत याचाही विचार

केला पाहिजे. हिंदू धर्मव्यवस्थेऐवजी ब्राह्मणी धर्मव्यवस्था म्हणणाऱ्यांपैकी ब्राह्मण नसलेल्या जातीतील लोकांना (ज्यांना इथल्या प्रस्थापित धार्मिक व्यवस्थेविरूध्द लढायचे आहे) हिंदूधर्मव्यवस्थेचे पालन करणे सोयीचे होते. त्यामुळे अशा लोकांना आपापल्या जातीय वर्तनव्यवहाराबद्दल अपराधजाणीव होत नाही. परिणामत: असे लोक जाति-निर्मूलनाच्या चळवळीत निरर्थक ठरतात. आता तर हा मुद्दा आणखीच 'कळी' चा झालाय. केंद्रातील भाजप सरकारबद्दल मध्येच कोणीतरी म्हणतं 'भाजपला भारत हे हिंदूराष्ट्र बनवायचे आहे.' त्यावर लगेच आणखी कुणाची तरी प्रतिक्रिया येते 'भारत हे हिंदूराष्ट्रच आहे, तेव्हा बनवायचा वगैरे प्रश्नच येत नाही.' अशा वेळी हिंदूधर्म व्यवस्थेला

ब्राह्मणी धर्मव्यवस्था म्हणणाऱ्यांची प्रतिक्रिया जाणून घेणं उद्बोधक ठरणार आहे. तेव्हा या मुद्याला बगल देऊन कोणी जातिनिर्मूलनाची चळवळ यशस्वी करेल या भ्रमात राहण्याचे कारण नाही. या मुद्याचीच आणखी एक कडी म्हणजे 'हिंदू धर्म नाकारून बौद्ध धम्म स्वीकारलेल्यांनी तरी आपली जात सोडली आहे काय? ' हा प्रश्न होय. या प्रश्नाचं उत्तरं गणिती किंवा भूमिती पद्धतीनं देता येणार नाही. मात्र कोणीही समाजशास्त्रीय निकष लावून पाहिले तर लक्षात असे येईल की, 'धम्मक्रांती'ला अनुसरलेल्या समूहातील वर्तनव्यवहाराच्या संदर्भात इतर समूहाच्या तुलनेने जात-जाणीवा क्षीण झाल्या आहेत. आणि त्याचवेळी प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष घडणाऱ्या जातीय वर्तनाबद्दलच्या अपराधजाणीवा प्रखर झाल्या आहेत. म्हणूनच 'धम्मक्रांती'ला अनुसरलेला समूह जातिव्यवस्थेचं तात्त्विक किंवा अन्य कोणत्याच प्रकारचं समर्थन करीत नाही. म्हणून या संदर्भात तूर्त इतकचं म्हणता येईल की, 'धम्मजाणीवा जितक्या प्रखर होतील तितक्या जात-जाणीवा क्षीण होतील' आणि जातिनिर्मूलनाच्या दिशेने टाकलेले हे एक भक्कम पाऊल पडत असेल. अर्थात हा मार्ग सर्वांसाठी आहे. हिंदू धर्मव्यवस्थेत राहून जात-जाणीवा क्षीण होणार नाहीत, हे कटू सत्य मान्य करणार की नाही?

याच प्रकारच्या आणखीन एका मुद्याबद्दल स्पष्टीकरण द्यावे लागेल. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी नामांतर, स्थलांतर, धर्मांतर आणि राष्ट्रांतर अशी चतु:सूत्री मांडली होती. मात्र यातील राष्ट्रांतर शक्य नसल्याने पहिल्या तीन सूत्रांचाच त्यांनी विचार केला, इतकेच नव्हे तर त्यानुषंगाने कृतीही केली. स्थलांतराच्या संदर्भात त्यांचे म्हणणे असे की, इथलं प्रत्येक खेडं हे विषमतेचं नमुनेदार उदाहरण आहे. तेव्हा त्यांनी 'खेडी सोडा, शहराकडे चला' असे आवाहन केले: लोकांनीही काही प्रमाणात का असेना या आदेशाचे पालन केले. लोक शिक्षणाच्या/ नोकरीच्या निमित्ताने शहरात येऊ लागले. सुरुवातीच्या काळात त्यातील बहुसंख्य लोक झोपडपट्टीत राहू लागले, तेव्हाही अशीच टीका होऊ लागली, नव्हे आजही ती टीका होत आहे की, - खेडी सोडून तुम्ही शहरात आलात आणि येथेही झोपडपट्टीतच राहायला लागलात मग तुमच्यात फरक तो काय पडला? म्हणजे तुम्ही खेड्यातच राहिले पाहिजे, हिंदू धर्मातच राहिले पाहिजे, असा त्यांचा आदेश. पण त्यांना तूर्त इतकेच सूचित करावे लागले की खेड्यातून शहरात आलेली पहिली पिढी कदाचित झोपडपट्टीत राहिलीही असेल पण त्याचीच दुसरी आणि तिसरी पिढी आता कुठे राहते याचा शोध घ्या म्हणजे स्थलांतराची किमया कळेल! आणि आपल्या मुख्य विषयाच्या संदर्भात बोलायचं तर यापैकी जातीय अत्याचाराचे किती बळी पडले! जसे की आज अहमदनगर जिल्ह्यातील खेड्यामधून अत्याचार होत आहेत. त्यातही एक बारीकसा फरक करता येतो आणि तो अत्यंत महत्त्वाचा आहे. खेड्यात उच्चजातीय लोक मागासलेल्या जातींना मारतात. अगदी जीवे मारतात. शहरात असं काही घडलं तर फार तर मारामारी होऊ शकते. खेड्यात फक्त मार खावा लागतो. आणि याहीपेक्षा महत्वाचा मुद्दा, त्याच समाजातील खेड्यातून शहरात आलेला माणूस त्या जुनाट, टाकाऊ व्यवस्थेतून मुक्त

झालेला असतो. मागासलेल्या समाजाचं खेड्यात जगणं आणि शहरात जगणं हे वर वर पाहता अनेकांना सारखंच वाटत असेल. विशेषत: केवळ आर्थिक जीवनाला प्राधान्य देणाऱ्या विचारसरणीच्या लोकांना, पण त्यामधील फरक कोणाला नीट समजून घ्यावा लागेल.

वास्तविक हा मुद्दा जातीय अत्याचार प्रतिबंधात्मक उपायांशीही निगडीत आहे. म्हणून जातीय अत्याचार प्रतिबंधात्मक म्हणा किंवा निर्मूलनाचे एक पाऊल म्हणा आजही पुन्हा एकदा 'खेडी सोडा आणि शहराकडे चला' हे अभियान कृतीशील करण्याची गरज आहे. ज्यांच्यावर जातीय अत्याचार झालेत त्यांना वेगवेगळ्या एजन्सीकडून ( आणि प्रशासनाकडूनही ) आर्थिक मदत मिळते. पण त्यांना पुन्हा तिथेच राहावे लागते. मग त्यांच्यावर पुन्हा अत्याचार होतो. तेव्हा निदान अशा अत्याचारग्रस्त लोकांचे तरी शासनाच्या वतीने शहरात निवास आणि प्रतिष्ठित उदरनिर्वाहाच्या साधनासह स्थलांतर करावे. याहीपुढे जाऊन ज्यांना खेड्यात असुरक्षित वाटते अशा सर्वांचीच प्रतिष्ठित उदरनिर्वाहाच्या साधनासह शहरात स्थलांतर करावे.

जातीय अत्याचारविरोधी आंदोलनाशी नक्षलवाद्यांचा जोडला जात असलेला संबंध हा एक अत्यंत गुंतागुंतीचा आणि फुले-आंबेडकरी चळवळीपुढचा आव्हानात्मक मुद्दा आहे. नक्षलवाद त्याची निर्मिती, त्याचे तत्त्वज्ञान, मार्ग आणि उद्देशपूर्ती वगैरे हा एक स्वतंत्र आणि मोठा विषय आहे. परंतु डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी मार्क्सच्या मार्गावर प्रश्नचिन्ह उभे केले आणि तो नाकारला. याबद्दल अजूनही चळवळीतील कार्यकर्त्यांपेक्षा केवळ अभ्यासकांच्या स्तरावर एकमत नाही. परंतु एक गोष्ट बहुतेक लोक मान्य करतात की, आंबेडकरी चळवळ आणि नक्षलवादी चळवळ एक नाही. परंतु आंबेडकरी चळवळीलाच जातीय अत्याचाराच्या विरोधात लढताहेत म्हणून नक्षलवादी ठरविणे, म्हणजे काही नक्षलवादी आंबेडकरी चळवळीत घुसखोरी करतात. किंवा आंबेडकरी चळवळीतील काही कार्यकर्त्यांना नक्षलवादी ठरविले जाते. हे कळीचे मुद्दे असले तरी सर्वांत महत्वाचा थेट मुद्दा म्हणजे जेव्हा एखादी जातीय अत्याचाराची घटना घडते तेव्हा पोलीस आणि शासकीय यंत्रणेने त्याची तत्काळ दखल घेऊन योग्य ती कायदेशीर आणि न्यायालयीन कारवाई केली तर, एक तर जातीय अत्याचार करणाऱ्या गुन्हेगारांवर कायद्याची जरब बसेल आणि दुसरे महत्वाचे म्हणजे नक्षलवादी (यांना पोलीसयंत्रणा तसं मानते) आंबेडकरी आंदोलनात घुसखोरी करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. इतकेच नव्हे तर इतर कोणत्याही चळवळीने या मुद्यावर आंदोलन करण्याचाही प्रश्न उद्भवत नाही. एखादा जातीय गुन्हा घडतो अगदी खुनानंतर मृत शरीराचेही तुकडे-तुकडे करण्यापर्यंत क्रूरतेची परिसीमा गाठली जाते. आठ पंधराच नव्हे तर महिने लोटले तरी गुन्हेगार शोधले जात नसतील तर 'आरोपींना अटक करा' या मागणीसाठी संघटनांना मोर्चे/आंदोलने करावी लागत असतील तर ही बाब पोलीस यंत्रणेला किंवा एकूणच प्रशासनला भूषणावह वाटते काय? अशावेळी आंदोलन तीव्र झाले की 'नक्षलवादी' आंदोलनात सहभागी झाले म्हणायचे! आणि समजा पोलीस यंत्रणा म्हणते त्याप्रमाणेच खरोखरच जर नक्षलवादी आंदोलनात सहभागी होत असतील तर त्याला पोलीस यंत्रणा आणि प्रशासन (निष्क्रीयपणा आणि उदासीनपणा) केवळ जबाबदार नाही तर त्याचा अर्थ असा होतो की, अशा नक्षलवाद्यांना पोलीस आणि प्रशासन यंत्रणाच आमंत्रण देते, असाच निष्कर्ष निघतो. आता सद्या गाजत असलेल्या अहमदनगर जिल्ह्यातील जवखेडा येथे घडलेल्या तिहेरी खूनाचेच उदाहरण घ्या. वास्तविक यापूर्वी अहमदनगर जिल्ह्यातील सोनाई आणि खर्डा येथे जातीय अत्याचाराच्या घटना घडल्या होत्या. जर या दोन्ही प्रकरणामध्ये अत्याचारानंतर पोलीसी

आणि न्यायालयीन कारवाई तत्काळ घडली असती तर कदाचित जवखेडा येथील अत्याचार घडला नसता. आता यातून तरी पोलीस यंत्रणा आणि प्रशासन काही धडा शिकणार आहे की नाही?

जातीय अत्याचार निर्मूलनासाठी जाति-निर्मूलन अपरिहार्य ठरले तरी जाति-निर्मूलनाचे प्रयत्न इतक्या वर्षानंतरही दखलपात्र यशस्वी होताना का दिसत नाहीत? या संदर्भात समाजशास्त्रीय एक मत असे की, एखादी व्यवस्था (जशी की जातिव्यवस्था) समाजात जर दीर्घकाळ टिकून राहिली तर त्यानंतर अशा व्यवस्थेत अगदी क्रांतिकारक बदल झाले तरी बदललेल्या व्यवस्थेतही जुन्या व्यवस्थेतील जातीय अवशेष त्याच्या परिणामक्षमतेसह शिल्लक राहतातच. त्यामुळे अशी व्यवस्था बदलली तरी ती मुळासह बदलली असे होत नाही. आणि असे घडण्याचे प्रमुख कारण म्हणजे ज्याचा उल्लेख यापूर्वी केला आहे ती म्हणजे सामूहिक अबोधावस्था किंवा सामूहिक नेणीव होय.

यावर उपाय म्हणजे सखोल असे वैचारिक संस्काराचे प्रबोधन होय. जाति-निर्मूलनासाठी जातिव्यवस्थेचं आकलन करून घेणं आवश्यक. परंतु हे आकलन करून घेताना भारतीय आणि पाश्चात्य अभ्यासकांना जातिव्यवस्थेने चकवा दिला आहे. त्यामुळे आकलन पुरेसे झालेले नाही, म्हणून प्रयत्नही अपुरे आणि परिणामही दखलपात्र नाही. परंतु डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतातील जातिव्यवस्थेच्या उगमाचा, संरचनेचा आणि विकासक्रमाचा नेमकेपणाने उलगडा करूनही जातिव्यवस्था कशी नष्ट करता येऊ शकते त्याची तात्त्विक मांडणी तर केलीच पण सुनिश्चित असा कृती-कार्यक्रमही दिला. तरीही केवळ सामान्यच नव्हे तर चळवळीतले कार्यकर्तेही संभ्रमात आहेत की अगतिक आहेत हाच एक प्रश्न आहे.

- जातिनिर्मूलन करणे म्हणजे केवळ त्या एका विशिष्ट जातीत जन्माला आल्यामुळे करावा लागणारा सगळा वर्तनव्यवहार नाकारणे. यामध्ये जर ५० बाबी येत असतील तर एखादा क्रांतिकारक (?) म्हणाला की मी यातील ४० बाबी नाकारल्या आहेत, १० मी नाकारू शकत नाही तर त्याने जातिनिर्मूलनाच्या दिशेने काही पावले टाकली अशी समजूत करून घेणे चुकीचे ठरेल. जात नाकारायची तर अनुषंगिक सगळ्याच गोष्टी नाकारल्या पाहिजेत. तसेच जातीय वर्तनव्यवहारच नव्हे तर विचारव्यवहारही नियंत्रण करणाऱ्या मूल्यात्मक आणि तात्त्विक घटकांचे निर्मूलन करणे होय. म्हणजे तुमच्या कोणत्याच वर्तनव्यवहारावरून किंवा विचारव्यवहारावरून तुमची जात ओळखता नाही आली पाहिजे. म्हणजेच तुमच्या वर्तन आणि विचारातून 'जात' वजा झाली पाहिजे. स्वत:ची आणि इतराचीही. एकेका जातीची एकेक किंवा काही जातींची एक असलेली कुलदैवते नाकारा. अमूक एका जातीत जन्मल्यामुळे करावा लागणारा व्यवसाय नाकारा. इ. इ.
- जातिव्यवस्थेला असलेला धर्माचा आधार त्याचा धर्मशास्त्रासह नाकारा. धर्मशास्त्रासोबत अध्यात्मही नाकारा. शाश्वतवादी तत्त्वज्ञान नाकारा. जातिनिर्मूलनाच्या चळवळीतील कार्यकर्तेही धार्मिक व्यवस्थेबद्दल बोलायला तयार नाहीत. पण डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे Annihilation of Caste वाचले की Annihilation of Religion आवश्यक वाटते. आणि म्हणून जातिनिर्मूलनासाठी धार्मिक व्यवस्थेचेही निर्मूलन आवश्यक ठरते. अर्थात ही बाबही आता हळूहळू अभ्यासकाच्याही लक्षात येऊ लागलीय, ही गोष्ट स्वागतार्ह होय. आणि तरीही धार्मिक लोक यावर एक पळवाट काढण्याचा प्रयत्न करतात की, जातिव्यवस्था/ जातीय वर्तन व्यवहार हा काही धर्माचा अविभाज्य भाग नाही. तर तो रूढी, परंपरेचा भाग आहे. पण हा दावा न टिकणारा आहे. कारण भारतातल्या जातिव्यवस्थेला/ जातीय वर्तनव्यवहाराला इथल्या धार्मिक व्यवस्थेने, धर्मशास्त्राने आणि धर्माच्या शाश्वतवादी

तत्त्वज्ञानाने आधार दिलेला आहे. तसे नसते तर एक विशिष्ट व्यवसाय करणारे लोक जगभर आहेत. आणि त्यांचे धर्मही आहेत. परंतु भारतातल्या तेच काम करणाऱ्या माणसाला जी सामाजिक प्रतिष्ठा किंवा दर्जा आहे तोच दर्जा किंवा प्रतिष्ठा तेच काम करणाऱ्या जगभरातील लोकांना आहे का? उदा. १) चामड्याशी संबंधित व्यवसाय करणारे लोक किंवा समूह २) लाकडाशी संबंधित काम करणारे लोक किंवा समूह – जातिवरून इतर देशात व्यवसाय ठरत नाही आणि व्यवसायावरून सामाजिक दर्जाही ठरत नाही. मग भारतात असा कोणता घटक आहे की, जो जातिवरून व्यवसायही निश्चित करतो आणि व्यवसायावरून सामाजिक दर्जा. तर तो आहे धर्म, त्याची धर्मशास्त्रे आणि त्यांचे शाश्वतवादी तत्त्वज्ञान म्हणून जातिनिर्मूलनासाठी हे सगळं नाकारलं पाहिजे.

- जातिनिर्मूलनाची समस्या ही केवळ मागासलेला मानलेल्या जातिसमूहाची आहे या आपत्तीतून बाहेर पडले पाहिजे. खरं तर इथला उच्चजातीय मानला गेलेला ब्राह्मण आणि तत्सम समाजाने जातिनिर्मूलनाच्या चळवळीत अग्रभागी राहिले पाहिजे. प्रत्यक्ष सत्तेत असोत वा नसोत, बुद्धिजीवी वर्ग समाजाला प्रभावित करीत असतो आणि आपल्याकडे ब्राह्मणवर्गाला बुद्धिजीवी मानले जाते. म्हणूनही त्यांनी या चळवळीत सहभागी झाले पाहिजे अशी भूमिका डॉ. बाबासाहेब आंबेडकर घेतात. पण त्यांच्या सहभागाबद्दलचे नकारात्मक आकलनही मांडतात. ज्याप्रमाणे जपानमधील सामुराइंनी आपले जन्माधिष्ठित प्रतिष्ठेचे अधिकार नाकारले आणि सामान्य माणसासारखे जीवन जगायला ते आपणहून तयार झाले.त्याप्रकारची अपेक्षा इथल्या उच्च जातींकडून डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि राजर्षी शाहू महाराज यांनीही व्यक्त केली होती. परंतु भारतात हे किती शक्य आहे, त्याबद्दल प्रश्नचिन्हही उभे केले होते.

- अस्पृश्यता निर्मूलनाप्रमाणे जाति-निर्मूलनाचा कायदा झाला पाहिजे, अशी एक भूमिका अलीकडे घेतली जात आहे. परंतु पुन्हा प्रश्न आहे तो कायद्याच्या प्रामाणिकपणे अंमलबजावणीचा! खरं तर प्रत्यक्ष कायद्यापेक्षा किंबहुना जास्त महत्वाचा असतो तो त्या कायद्यामागील हेतू (spirit behind it) परंतु तोच आपल्याकडे 'गहाळ' करण्याचे 'कसब' इथल्या जातीय समर्थकांनी आश्चर्य वाटावे इतके कमावले आहे.

- 'ऑनर किलिंग'सारख्या घटनांच्या प्रेरणा आणि समर्थन ठरत असलेल्या 'खाप-पंचायती' आणि जात-पंचायती या जातीचे गौरवीकरण, अल्पसंतुष्टपणातून किंवा अज्ञानातून करीत असतात. खोट्या प्रतिष्ठेसाठी जातींचे पोलादीपण टिकवून ठेवतात. येथेही पुरुषसत्तेवर जातीय सत्ताच प्रभाव टाकत असते. या अशा गौरवीकरणातून जतन केल्या जाणाऱ्या जातिव्यवस्थेवर कायद्याच्या आणि प्रबोधनाच्या माध्यमातून आघात केले पाहिजेत.

- जेथे शक्य आहे तेथे तरी मिश्र वसाहती निर्माण केल्या पाहिजेत.

- विचाराच्या जागृतीमुळे जाणीवेच्या स्तरावर जात नाकारणाऱ्या संस्कारामुळे नेणीवेच्या स्तरावर तोच माणूस जात स्विकारून, तशी कृतीही करतो. हे दुंभंगलेपण सांधण्यासाठी जातिनिर्मूलनाच्या विचारांच्या संस्काराची. गरज आहे जातीय अत्याचार निर्मूलनासाठी.

- (जातिनिर्मूलनासाठी) धार्मिक व्यवस्थांचेही निर्मूलन आवश्यक झाले आहे. हिंदूमधून इतर धर्मात गेलेल्यांनी आपली जातही घेऊन गेल्याने किंवा त्याही धर्मात जातींना सामावून घेण्याची सोय असल्यामुळे अशा धार्मिक

व्यवस्थेतही हस्तक्षेपाची गरज आहे आणि त्यासाठी संविधानातील सेक्युलर तत्त्व अधिक प्रभावशाली कार्य करू शकते.

जातीय अत्याचाराने क्रूरतेचे आणि अमानुषतेचे आज टोक गाठले आहे. तरीही फुले, आंबेडकरी चळवळीने कायदा हातात न घेता कायद्याला कृतीप्रवण करणे एवढेच आज तरी आपल्या हातात आहे.... पुढे काय घडेल हे आपल्या सर्वांच्या विचार आणि कृती करण्यावर अवलंबून राहील.

त्रैमासिक 'सेक्युलर व्हिजन'च्या सौजन्याने

gautamiputrak@gmail.com

●●●

# रवींद्रनाथ टागोर आणि राष्ट्रवाद

*डॉ.सुरेश खैरनार*

चिकित्सा चरित्र राजकारण समाजकारण

पुराणात भस्मासूर नावाच्या राक्षसाची गोष्ट प्रसिद्ध आहे .तो ज्याच्या डोक्यावर हात ठेवेल त्याची जळून राख व्हायची . आजकाल संघ परिवाराने ह्याच भस्मासूराचा अवतार धारण केला आहे .संघाने आपल्या राष्ट्रपुरूषांच्या डोक्यावर आपला हात ठेवायला सुरूवात केली आहे .स्वामी विवेकानंदापासून योगी अरविंद, रामकृष्ण परमहंस, सरदार वल्लभभाई पटेल, महात्मा गांधी हे सर्वच संघाच्या क्षुद्रीकरणाच्या मोहीमेचे शिकार झाले आहेत, आणि आता पाळी आलीय रवींद्रनाथ टागोरांची .आजी सरसंघचालक मोहन भागवत मध्यप्रदेशाच्या सागर येथील संघ शिबिरात आपल्या भस्मासूरी अवताराची ओळख करून देत म्हणाले की, रवींद्रनाथ टागोरांनी आपल्या 'स्वदेशी समाज' नावाच्या पुस्तकात सर्वप्रथम हिंदू राष्ट्राची संकल्पना मांडली आहे. ( मराठी दैनिक लोकसत्ता, नागपुर, दि .२०.०१.२०१५ अंक ) पहिला मुद्दा हा आहे की, 'स्वदेशी समाज' नावाचे पुस्तक नाही, तर एकूण तीस पानांचा एक निबंध, जो टागोरांनी बंगभंग (१९०५) च्या नंतर लगेचच तेथील पाण्याच्या समस्येवर, एका टीकटिप्पणीच्या स्वरूपात लिहिला होता . त्यांनी त्या लेखात हिंदु राष्ट्र ह्या संकल्पनेचे समर्थन केलेले नाही, उलट त्यात त्यांनी असे म्हटले होते की, 'आर्यांनी जेव्हा भारतावर आक्रमण केलं तेव्हा स्थानिक जातीजमातींनी त्यांना आपल्यात सामावून घेतले .त्यानंतर मुसलमान आले, त्यांनाही अशाच प्रकारे सामावून घेतले गेले.' भारतभूमीच्या ह्या वैशिष्ट्याचा टागोरांनी आपल्या निबंधात उल्लेख केला आहे .महत्वाची बाब ही आहे की, टागोरांनी नेहमीच नेशन स्टेट (राष्ट्र-राज्य) ह्या संकल्पनेवर टीका केली आहे . त्यांनी ही संकल्पना शुद्ध युरोपीय आहे असं म्हटलं आहे .आपल्या १९१७ च्या 'नॅशनॅलिझम इन इंडिया' नावाच्या निबंधात त्यांनी स्पष्टपणे लिहिले आहे की, 'राष्ट्रवादाचा राजकीय आणि आर्थिक संघटनात्मक आधार केवळ उत्पादनवृद्धी तसेच मानवी श्रमामध्ये बचत करून अधिक संपन्नता प्राप्त करण्याचा यांत्रिक प्रयत्न इतकाच आहे . राष्ट्रवादाची धारणा मुळातच जाहीरात आणि माध्यमांचा उपयोग करून राष्ट्राची समृद्धी तसेच राजकीय शक्ती ह्यामध्ये वाढ करण्यात आकारीत झाली आहे .बलविकास ह्या संकल्पनेने राष्ट्रांमध्ये परस्पर द्वेष, घृणा आणि भयाचे वातावरण निर्माण करून मानवाच्या जीवनाला अस्थिर आणि असुरक्षित केले आहे .हे तर सरळ सरळ जीवनाशी खेळणे आहे,

कारण की राष्ट्रवादाच्या ह्या बलाचा उपयोग बाह्य संबंधांसोबतच राष्ट्राच्या अंतर्गत परिस्थितीवर बंधन टाकण्यातही होतो .अशा परिस्थितीत समाजावर नियंत्रण वाढणे स्वाभाविकच आहे .परिणामी, सामाजिक, तसेच व्यक्तीच्या खासगी जीवनाला राष्ट्र व्यापून टाकते, आणि एक भयावह नियंत्रणात्मक रूप आकारात येते.'

रवींद्रनाथ टागोरांनी ह्याच आधारावर राष्ट्रवादावर टीका केली आहे .ते म्हणतात, 'राष्ट्रवाद म्हणजे जनतेच्या स्वार्थाचे असे संघटीत रूप की ज्यामध्ये मानवता तसेच आपलेपणा किचिंतही शिल्लक राहात नाही .दुर्बल आणि असंघटीत शेजारी राज्यांवर अधिकार मिळवण्याचे प्रयत्न हा राष्ट्रवादाचा स्वाभाविक परिणाम आहे .ह्यातूनच निर्माण झालेला साम्राज्यवाद, अखेर मानवतेचा खुनी बनतो .राष्ट्राच्या बलविकासावर काही नियंत्रण शक्य नसते, त्याच्या विस्ताराला काही सीमा नसते .राष्ट्रवादाच्या अनियंत्रित शक्तीमध्येच मानवतेच्या विनाशाचे बीज आहे.'

राष्ट्रांचा परस्परांतील संघर्ष जेव्हा विश्वव्यापी युद्धाचं रूप धारण करतो, तेव्हा त्याच्या संहारक शक्तीच्या समोर सर्वच नष्ट होत जाते .हा निर्मितीचा रस्ता नाहीये तर विनाशाचा रस्ता आहे .राष्ट्रवादाची भावना कशा रितीने मानवी समुहांमध्ये शत्रुत्व आणि स्वार्थ निर्माण करते, ह्या गोष्टीला उघड करणारे रविंद्रनाथ टागोर ह्यांचे हे मौल्यवान चिंतन, सर्व विश्वाकरता एक अमूल्य योगदान आहे, आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंचालक मोहन भागवत मात्र टागोरांना हिंदु राष्ट्रवादाचे समर्थक बनवून त्यांची राखरांगोळी करण्याचा प्रयत्न करत आहेत.

भारतासाठी राष्ट्रवाद हा पर्याय होऊच शकत नाही .रवींद्रनाथ टागोरांनी म्हटलंय की, भारतात राष्ट्रवाद नसल्यासारखाच आहे .वास्तव हे आहे की, भारतात युरोपासारखा राष्ट्रवाद वाढूच शकत नाही, कारण स्पष्ट आहे, सामाजिक जीवनात रूढींचे पालन करणारेच जर राष्ट्रवादाच्या गोष्टी करू लागले तर राष्ट्रवाद कसा विकसित होईल? त्या काळातील काही राष्ट्रवादी विचारवंत स्वित्झर्लंडला ( जो बहुभाषी आणि बहूजातीय असूनही राष्ट्राच्या स्वरूपात अस्तित्वात आहे ) भारताच्या दृष्टीने एक अनुकरणीय उदाहरण मानत होते .परंतु रवींद्रनाथ टागोर असे मानत होते की, 'स्वित्झर्लंड आणि भारत ह्यामध्ये जमीनअस्मानाचं अंतर आहे .तेथे व्यक्तीव्यक्तींमध्ये जातीभेद नाही आणि त्यांच्यात आपसात आपलेपणाचे नाते तर आहेच, पण आंतर्विवाहही मान्य आहे, कारण की ते आपल्याला एकाच रक्ताचे मानतात .परंतु भारतात जन्माधिकार समान नाही .जातीजातीतील विभिन्नता तसेच परस्परातील भेदभाव ह्या कारणांमुळे भारतात त्या प्रकारची राजकीय एकता प्रस्थापित करणे ही कठीण बाब आहे, जी कुठल्याही राष्ट्राला अत्यावश्यक असते.' टागोरांचे मत आहे की समाजाकडून बहिष्कृत होण्याच्या भितीमुळे भारतीय भेकड बनले आहेत . जेथे खाण्यापिण्याचेही स्वातंत्र्य नाही, तेथे राजकीय स्वातंत्र्याचा अर्थ, काही व्यक्तींचे इतर सर्वांवर नियंत्रण असाच होणार .ह्यातून निरंकुश राज्यसत्ता आकारात येईल, आणि राजकीय जीवनात विरोधी वा वेगळे मत असणाऱ्याला जगणे अशक्य होईल .अशा नावापुरत्या असलेल्या स्वातंत्र्याकरता आपण आपल्या नैतिक स्वातंत्र्याला तिलांजली देणार आहोत का?

संकुचित राष्ट्रवादाच्या विरोधात ते पुढे लिहितात की, राष्ट्रवादातून जन्मणारी संकुचितता हा मानवाचे नैसर्गिक स्वातंत्र्य आणि आध्यात्मिक विकास यांच्या रस्त्यावरील अडथळा आहे .ते राष्ट्रवादाला, युद्धपिपासू वृत्तीला उत्तेजन देणारा आणि समाजविरोधी समजतात, कारण की, राष्ट्रवादाच्या नावांवर होणारा शासनशक्तीचा अनियंत्रित उपयोग अनेक अपराधांना जन्म घालतो .व्यक्तीला राष्ट्राकरता समर्पित करणे त्यांना कदापीही मान्य नव्हते .राष्ट्राच्या नावानं मानवसंहार, तसेच मानवीय संघटनांवरील बंधन हे त्यांना सहन होणे शक्य नव्हते.

त्यांच्या विचारानुसार राष्ट्रवादाचा सर्वात मोठा धोका हा होता की, सहिष्णूता आणि त्यात अभिप्रेत असलेली नैतिक परमार्थाची भावना, राष्ट्राच्या स्वार्थपरायण नितीमुळे नष्ट होईल .अशा अनैसर्गिक आणि अमानवीय विचारांना राजकीय जीवनाचा आधार बनवल्याने सर्वनाशच होईल .ह्याचकरता, राष्ट्रवाद हा केवळ भारतासाठीच नव्हे तर सर्व विश्वासाठीच त्याज्य समजावा, असा टागोरांचा आग्रह होता .ते भारताच्या राष्ट्रवादी आंदोलनातील राजकीय स्वतंत्रतेच्या संबंधातही पक्षाचे टीकाकार होते, कारण त्यांचा असा विश्वास होता की भारत राष्ट्रवादातून शक्ती प्राप्त करू शकणार नाही .त्यांचे म्हणणे होते की, भारतानं राष्ट्र ह्या सकुंचित संकल्पनेला सोडून आंतरराष्ट्रीय दृष्टिकोन अनुसरायला हवा .आर्थिक दृष्टीने भारत मागासलेला असेलही, मानवी मूल्यांमध्ये तरी इथे मागासलेपण नको .दरिद्री असूनही भारत विश्वाला मार्गदर्शन करून मानवतावादी एकतेचा आदर्श प्रस्थापित करू शकतो .भारताचा पुरातन इतिहास हेच सिद्ध करतो की, भौतिक संपन्नतेची फिकीर न करता भारताने अध्यात्मिक जाणीवेचा सफलतापूर्वक प्रचार केला आहे .

**समाज आणि राज्य**

टागोर राष्ट्रवादावर टीका करतात, ह्याचे कारण ते समाजाला राज्यापेक्षा जास्त महत्व देत होते आणि मानवी विकासात माणसाला अधिक महत्वपूर्ण मानत होते .ते फॅसिझमला राष्ट्रवादाच्या पागलपणाचे प्रतिक मानत . फॅसिझमच्या उदयाच्या आधी राष्ट्रवाद, आर्थिक विस्तारवाद आणि साम्राज्यवादाशी जोडलेला होता .पहिल्या महायुद्धानंतर राज्याच्या वाढत्या शक्तिमुळे राष्ट्रवादाला राज्याने अधिक ताकदवान केले .वेनितो मुसोलिनी म्हणाला होता की, राष्ट्र राज्याची निर्मिती करू शकत नाही, तर राज्य राष्ट्रांची निर्मिती करू शकते .एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धातील आणि विसाव्या शतकाच्या पूर्वार्धातील राजकारणात महत्वाची झालेली राष्ट्रवादाची संकल्पना, मुळात सांस्कृतिक स्वरूपाची होती .ह्या विचाराच्या प्रभावाखाली येण्याआधी पश्चिमी देश हे अधिक विशाल विश्वव्यापी दृष्टिकोन राखून होते, आणि त्यामुळेच तेथील राष्ट्रवाद प्रथम सुप्तावस्थेत होता .परंतु प्रादेशिकतावादाने हळू हळू परिस्थितीत बदल होत गेला .यांत्रिकीकरणाने एक वेगळं नव्या प्रकारचे वातावरण आकारात आले .परंपरागत मूल्ये नष्ट केली जाऊ लागली, त्याचप्रमाणे मानव समुदायांच्या एकतेची विचारसूत्रे शबल होऊ लागली .भारतात हिंदू राष्ट्रवाद तसेच राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या उदयाला ह्या संदर्भातच समजून घ्यायला हवे.

दुसऱ्या गोलमेज परिषदेच्या नंतर (१९३१) हिंदू महासभेचे वरिष्ठ नेते धर्मवीर डॉ .मुंजे सरळ इटलीला गेले .तेथे त्यांनी अनेक स्थळांना भेटी दिल्या तसेच नाझी संघटनांची स्कूल्स, कॉलेजेस आणि प्रशिक्षण संस्था यांचा त्यांनी जवळून अभ्यास केला .डॉ .मुंजे ह्यांच्या डायरीची १३ पानं (जी नेहरू मेमोरीयलमध्ये उपलब्ध आहेत) दाखवून देतात की, त्यांनी १५ मार्च ते २४ मार्च, १९३१ ह्या दिवसांत तेथील मिलिट्री कॉलेज तसेच फॅसिस्ट अकादमी ऑफ फिजिकल एज्युकेशनचे निरीक्षण केले .महाराष्ट्रातील नागपूर येथे १९२५ मध्ये सुरू झालेल्या आर.एस.एस .च्या प्रशिक्षणासाठीच त्यांनी हा अभ्यास केला होता आणि इटलीहून निघण्याच्या आधी त्यांनी मुसोलिनीची भेट घेऊन इटलीमध्ये सुरू असलेल्या ह्या कार्यक्रमांची भरपूर प्रशंसा केली होती .डॉ .हेडगेवार ह्यांना भेटून आर.एस.एस .ला घडविण्यात ते साह्यभूत झाले .त्याचाच परिणामस्वरूप म्हणजे आजचा आरएसएस .ह्यांच्याकडून नागपूर आणि नाशिक येथे असलेल्या भोसले मिलीटरी स्कूलचे व्यवस्थापन केले जाते .ह्यानंतर जीवनातील प्रत्येक क्षेत्रात विविध संघटनांना आकार देऊन संघ आज आपल्या ताकदीची ओळख करून देत आहे .ज्यामध्ये क्रूरता, विकृती आणि फुटीरता वाढते, अशा राष्ट्रवादाच्या भूमिकेवर, रवींद्रनाथ टागोरांनी कडक टीका केली होती .ते राष्ट्रवादाला सत्तेचे

संघटीत सर्वव्यापी रूप मानून राज्याच्या शोषक भूमिकेकडे लक्ष वेधतात .त्यांच्या म्हणण्यानुसार, पश्चिमेत राष्ट्रवादाच्या यंत्राने प्रचंड दाबाचा उपयोग करून, व्यापार आणि राजनिती ह्यांच्या मान्यतेचे साफ, स्वच्छ गठ्ठे तयार केले गेले . आर.एस.एस .राष्ट्रवादाच्या नावांवर ह्याच संकल्पनेची येन केन प्रकारेण वकिली करत आहे .त्याच धोरणाच्या अंतर्गत, त्यांचे नेते वेळोवेळी कधी सरदार वल्लभभाई पटेल तर कधी रवींद्रनाथ टागोर ह्यांच्यासारख्या राष्ट्रीय नेत्यांच्या वचनांना, आपल्या विचारांच्या प्रचार, प्रसाराकरता, काटछाट करून संदर्भहीन उदधृत करतात .

रवींद्रनाथ टागोरांनी भारताला पश्चिमेच्या राष्ट्रवादापासून दूर राहण्याचा सल्ला दिला होता .त्यांच्या मतानुसार, आंतर्राष्ट्रीय सहयोगासाठी ह्या विषारी राष्ट्रवादापासून भारताने दूर राहणे ही गरजेची बाब आहे .त्यांचे असे म्हणणे होते की, पाश्चिमात्य विचार एक असा बांध आहे की जो त्यांच्या संस्कृतीला राष्ट्रवादी नसलेल्या देशाकडे प्रवाहित होण्याच्या आड येतो .ते भारताला राष्ट्र नसलेला देश मानत होते, कारण भारत हा विभिन्न वंशियांचा देश आहे आणि ह्या सर्व विभिन्न वंशियांमध्ये समन्वय राखणे ही देशाची गरज आहे .युरोपला अशी गरज भासत नाही .म्हणून युरोपमधील देश राष्ट्रवादाच्या मद्याचे सेवन करून आपल्या अध्यात्मिक आणि मनोवैज्ञानिक एकतेला धोका निर्माण करीत आहेत . त्यांच्या म्हणण्यानूसार भविष्यकाळात पश्चिमी राष्ट्रे एक तर परदेशियांकरता आपले दरवाजे बंद करतील किंवा परदेशीयांना ते आपले गुलाम बनवतील, ह्यातूनच त्यांच्या वंशवादी वृत्तीतून उदभवलेल्या समस्येची सोडवणूक होऊ शकेल .सरळच आहे, भारतासाठी हा पर्याय होऊच शकत नाही.

राष्ट्रवादाची समीक्षा करण्यासाठी रविंद्रनाथ टागोरांनी तीन प्रमुख आधारभूत मुद्दे उपस्थित केले आहेत-

- राष्ट्रवादी राज्यशासनाचे आक्रमक धोरण
- व्यापारी स्पर्धा, आणि
- वंशवाद

टागोर नाझीवादावर प्रखर टीका करायचे .फॅसिझम आणि कम्युनिझमची तुलना करताना त्यांनी फॅसिझमची असहनीय निरंकुशवाद अशी व्याख्या केली आहे .ते फॅसिस्टांच्या सत्तेला सर्वात अमानवी समजत होते, कारण त्या व्यवस्थेत प्रत्येकच गोष्ट नियंत्रित केली जाते .भारतात आर.एस.एस .हे काम प्रथमपासूनच करत आली आहे .मे २०१४ ला केंद्रात भाजपा सरकार आल्यावर संघ परिवाराचा उत्साह अधिकच वाढला आहे .ह्यामुळेच लवजिहाद, रामजादे-हरामजादे हे राग गायले जात आहेत .मदर टेरेसासारख्या गरीबांच्या संत महिलेपासून, चर्चवरील हल्ले, दंगली, तसेच आपल्याला अभिप्रेत असलेल्या हिंदुत्वाच्या प्रचार व प्रसाराच्या उद्देशानुसार, वेगवेगळ्या राष्ट्रनायकांच्या उक्तींचा विनासंदर्भ विकृत पद्धतीने उपयोग करणे, हा त्यांच्या सुनियोजित रणनितीचा भागच आहे .त्याच दिशाक्रमात संघाचे सरसंघचालक, रवींद्रनाथ टागोरांना हिंदु राष्ट्राचे समर्थक बनवण्याचा प्रयत्न करून, टागोरांचा अपमानच करत आहेत.

**संघाच्या संदर्भात विनोबाजींचे विचार**

आर.एस.एस .ने ह्यापूर्वी विवेकानंदांचीही ह्याच प्रकारे काटछाट करून त्यांची आपल्या सोयीची प्रतिमा जनमानसात नेण्याची अयशस्वी प्रयत्न केलेला आहे .स्वामीजी वैश्विक पातळीवरील विचारवंत होते .परंतु संघाने त्यांना संकुचित हिंदुत्वाच्या वेठीला बांधून त्यांना हिंदू सन्यासी वा साधूच्या रूपात पेश करून, त्यांचे अवमूल्यनच केले आहे . असत्याचा आधार घेणे, कोणतीही गोष्ट काटछाट करून, आपल्याला सोयीस्कर पद्धतीने विकृत करून पेश करणे, हा

संघाच्या रणनितीचाच एक हिस्सा आहे .खुद्द आचार्य विनोबा भावे तसे म्हणाले आहेत .गांधीजीच्या हत्येनंतर ११ मार्च ते १५ मार्च १९४८ ह्या दिवसांत सेवाग्रामला एक चिंतन-बैठक झाली होती .त्या बैठकीत विनोबाजींनी आपले मत अगदी स्पष्ट शब्दात व्यक्त केले की, " मी त्याच प्रांतातला आहे, जिथे आर.एस.एस.चा जन्म झाला आहे .मी जात सोडून बसलोय, पण हे विसरू शकत नाही की मी त्याच जातीचा आहे, ज्या जातीतील नाथूराम गोडसेने गांधीजीची हत्त्या केली आणि तो अशा संघटनेचा माणूस होता, जी संघटना एका हेडेगेवार नावाच्या ब्राह्मणाने स्थापित केली आहे .त्यांच्या देहांतानंतर जे सरसंघचालक बनले आहेत ते श्री .गोळवलकर हेही महाराष्ट्रीयन ब्राह्मणच आहेत .ह्याचे बरेचसे प्रचारक जरी पंजाब, मद्रास, बंगाल किंवा उत्तर भारत, कुठेही काम करत असतील, तरी त्यातील बहुतेकजण महाराष्ट्रीयन ब्राह्मणच आहेत .ही संघटना खूपच मोठ्या प्रमाणात पंरतु मोठ्या कुशलतेने पसरवली गेली आहे .ह्याची मुळे खूप खोल गेलेली आहेत .ही संघटना एकदम फॅसिस्ट पद्धतीची संघटना आहे .ह्यात मुख्यतः महाराष्ट्राच्या बुद्धीचा उपयोग केला गेला आहे .ह्याच्यातील सर्व पदाधिकारी आणि संचालक बहुधा महाराष्ट्रीयन आणि ब्राह्मणच राहिले आहेत .ह्या संघटनेचे लोक इतरांना विश्वासात घेत नाहीत .गांधीजींचा मार्ग सत्याचा होता .ह्यांचा मार्ग असत्याचा आहे, असे दिसते .हेच असत्य त्यांच्या तंत्राचा आणि विचारसरणीचा भाग आहे.

"एका धार्मिक नियतकालिकात मी त्यांच्या संघटनेचे सरसंघचालक श्री गोळवलकरांचा एक असा लेख वाचला, ज्यामध्ये त्यांनी हिंदू धर्माचा उत्तम आदर्श अर्जुन आहे, असे म्हटले आहे .अर्जूनाला आपल्या गुरूजन आणि आप्तजनांबद्दल स्नेह आणि आदर होता, परंतु कर्तव्यकर्म म्हणून त्याने त्यांना नम्रतापूर्वक प्रणाम करून, नंतर त्यांना ठार केले .ह्या प्रकारची हत्या जो करू शकतो, तोच खरा स्थितप्रज्ञ असतो, असे त्यांचे मत आहे .ह्या लोकांची गीतेबद्दलची भक्ती माझ्यापेक्षा कमी नाही आणि मी ज्या श्रद्धेने गीतावाचन करतो त्याच श्रद्धेने तेही रोज गीता वाचत असतील .

मनुष्य जर पूज्य गुरूजनांना आणि आपल्या आप्तजनांना ठार मारू शकत असतील तर तो स्थितप्रज्ञ, हे त्यांच्या दृष्टीने गीतेचे तात्पर्य आहे .बिचारी गीता !तिचा अनेक प्रकारे उपयोग केला जातो .अर्थ हाच आहे की, ही केवळ दंगली करणाऱ्या उपद्रव्यांची जमात नाहीये, ही तत्वज्ञान्यांची जमात आहे, त्यांचे आपले तत्वज्ञान आहे, आपले तंत्र आहे."

गीतेपासून गुरूदेव रवीन्द्रनाथ टागोरांच्या स्वदेशी समाजापर्यंत प्रत्येक गोष्टीचा आपल्या पद्धतीने सोयीस्कर अर्थ काढून त्याचा प्रचार, प्रसार करणे हा संघाच्या तंत्राचा एक भाग आहे .हे तंत्र संघाने १९२५ पासून हळूहळू विकसित केले आहे .रवीन्द्रनाथ टागोरांना १९१३मध्ये नोबेल पुरस्कार मिळाल्यामुळे त्यांना सर्व जगात भ्रमण करण्याची संधी उपलब्ध झाली .त्या यात्रेच्या दरम्यान १९१७ मध्ये जपानच्या यात्रेमध्ये देखील त्यांनी राष्ट्रवादावर कडक टीका केली होती .त्यावेळी जपान राष्ट्रवादाच्या ज्वरामध्ये चांगलाच तापलेला होता, त्यामुळे टागोरांना भाषण न करताच जपानहून परतावे लागले होते .असे हे टागोर हिंदु राष्ट्राचे समर्थक होते असे सरसकट खोटे विधान भागवत करीत आहेत. विनोबानी अगदी योग्य शब्दात सांगितले आहे की, तत्त्वज्ञानी लोकांची ही अशी जमात आहे की, ज्यांचे आपले खास तंत्र आहे .गीतेपासून, विवेकानंदापासून, गांधी, नेहरू आणि पटेलांपर्यन्त सर्वांनाच आपल्या सोयीप्रमाणे ठाकूनठोकून, काटछाट करून पेश करण्यात ते एकदम पटाईत आहेत .ह्या साखळीत रवीन्द्रनाथ टागोर ही नवी कडी आहे, एव्हढेच.

**संदर्भग्रंथ:**

1. कल तक बापू थे, हू विल गाईड अस नाऊ?: गोपालकृष्ण गांधी, पर्मनंट ब्लॅक पब्लिकेशन

2. टागोरः सिलेक्टेड एसेज, रूपा पब्लिकेशन, न्यू दिल्ली
3. स्वदेशी समाजः रवींद्रनाथ टागोर (मराठी अनुवाद)
4. रवींद्रनाथ रचनावलीः विश्व भारती पब्लिकेशन, शांती निकेतन
5. गांधी, नेहरू अँड टागोरः प्रकाश नारायण नातानी, पॉइंटर पब्लीकेशन, जयपूर
sureshkhairnar@yahoo.com

●●●

# विलास आणि विकास

*कुमार केतकर*

विकास खाउजा समाजकारण

अरुण जेटली यांनी सादर केलेल्या अर्थसंकल्पावर अपेक्षेप्रमाणे अजूनही वादळी चर्चा आणि घमासान धुमश्चक्री चालू आहे. ते स्वाभाविक आहे. कारण ‘अर्थकारण’ हे राजकारणाचाच अविभाज्य भाग असते. त्या दृष्टिकोनातून अर्थकारण म्हणजे सत्ताकारणही असते. सत्तेत असलेला वर्ग आपल्या प्रस्थापित वर्गाच्या हितसंबंधांचे संरक्षण आणि संवर्धन करण्यासाठी इतर (म्हणजे गरीब व मध्यम वर्ग) सामाजिक स्तरांना चुचकारण्याचा प्रयत्न करतो.

त्या दृष्टिकोनातून ते सत्ताकारण म्हणजे ‘वर्गकारण’ही असते. अर्थसंकल्पातून ध्वनित होत असतो तो ‘पडद्यामागे’ सुरू असलेला वर्गसंघर्ष. म्हणूनच तो त्या अर्थाने ‘वर्गसंकल्प’ही असतो. म्हणूनच अर्थसंकल्पाचा ‘अर्थ’ लावताना समाजातील वर्गसंबंधांचा वेध घ्यावा लागतो. कारण अर्थसंकल्प समाजातल्या सर्व थरांना ‘समान’ अर्थाने लाभकारक वा हानिकारक नसतो. काहींना तो भलामोठा लाभ करून देणारा असतो, तर काहींना वरवर समाधान देणारा. काहींच्या तोंडाला पाने पुसणारा, तर काहींच्या तोंडचा घास काढून घेणारा. शेतमजूर आणि सधन शेतकरी, कामगार आणि मालक, मध्यमवर्ग आणि श्रीमंत, बेकार आणि नोकरदार, ग्रामीण आणि शहरी अशा सर्वांना समाधानी करणे अशक्य, कारण वर्गसंबंध!

प्रत्येक माणसाला, प्रत्येक कुटुंबाला आपले जीवनमान सुधारायचे असते. आपल्या जीवनात अधिक ऐहिकता आणायची असते. कोणत्याही मोलकरणीला आपल्या मुलीनेही लोकांच्या घरी धुणी-भांडी करावी, असे वाटत नाही. कोणत्याही शेतमजुराला आपल्या मुलाने अशीच गुलामीसदृश मजुरी करावी, असे वाटत नाही. कोणत्याही हमालाला आपल्या मुलांनी हमाली करून पोट भरावे, असे वाटत नाही. त्याचप्रमाणे प्रत्येक मध्यमवर्गीय माणसाला वा कुटुंबालाही चाळीतून फ्लॅटमध्ये, फ्लॅटमधून मोठय़ा ‘थ्रीबीएचके’मध्ये, जमले तर फार्म हाऊस, नॅनोपासून होंडा सिटी ते मर्सीडीजपर्यंत ‘आकांक्षांपुढती असे गगन ठेंगणे’! (या कवितेचा मध्यमवर्गाने इतका उपहास करून टाकला आहे!) अर्थसंकल्पीय राजकारणातून ‘अच्छे दिन’ आणण्याचे भ्रम विकण्याचा धंदा सध्या जोरात आहे. योजना आयोगच रद्द केल्यामुळे आता नियोजनाची जागा वल्गनांनी घेतली आहे.

१९५७ नंतर दुसऱ्या पंचवार्षिक योजनेमुळे, जवाहरलाल नेहरूंच्या नेतृत्वाखाली अर्थव्यवस्थेला गती प्राप्त झाली होती. भिलाई, बोकारो, दुर्गापूरचे स्टील उद्योग, भाक्रानांगल, नागार्जुनसागरसारखी प्रचंड धरणे, खंबायतपासून तेलाच्या खाणी खोदण्यात झालेली प्रगती, विद्युत उत्पादनाचे मोठाले प्रकल्प, एच.एम.टी.सारखे यंत्रसामग्री तयार करणारे कारखाने, फर्टिलायझर कार्पोरेशनचे हिंदुस्थान रसायनीसारखे मौलिक रासायनिक द्रव्ये, खते उत्पादन करणारे अचाट कारखाने, आवश्यक औषधनिर्मिती करणारे उद्योग इत्यादि होऊन ३० वर्षांत भारताने आपला चेहरामोहरा बदलला होता. पण ग्रामीण व कृषीजीवन अजूनही धिम्या गतीने प्रगत होत आहे.

ज्याला आपण ‘गरिबी’ किंवा ‘दारिद्र्य’ म्हणतो, ते या शेतीसंबंधातील असमतोलामुळे निर्माण झालेले आहे. ‘गरिबी’ची आर्थिक संकल्पना सापेक्ष आहे. औद्योगिक क्रांतिपूर्व काळात जगातील बहुसंख्य लोक ‘गरीब’च होते. ‘गरिबी हटाओ’ असा विचारसुद्धा तेव्हा संभवत नव्हता. विज्ञान, उद्योगीकरण आणि नंतर निर्माण झालेल्या सामाजिक-राजकीय जाणिवेतून ‘गरिबी’बद्दलचा आधुनिक विचार जन्माला आला आणि जर ही गरिबी प्राय: शेतीसंबंधाशी निगडित असेल, तर ते शेतीसंबंध बदलणे, म्हणजे ‘गरिबी’च्या प्रश्नावर हल्ला करणे. म्हणजेच प्रस्थापित चौकट मोडणे.

सर्वसाधारण माणसाच्या भौतिक गरजा फार म्हणजे फारच कमी असतात. खरे तर आपल्या देशातील ३५-४० टक्के गरीब जनतेची जीवनशैली ही अशीच म्हणजे गरीब, दरिद्री वा निकृष्ट आहे, असे आपण म्हणतो. पण ती जीवनशैली त्यांच्यावर लादली गेली आहे, त्यांनी स्वेच्छेने स्वीकारलेली नाही. त्यांच्याकडेही अगदी माफक (वा त्याहूनही कमी) कपडे आहेत. त्यांचा आहार त्यांना जिवंत ठेवण्याइतकाच आहे आणि त्यांच्याकडे पैसेच नसल्यामुळे त्यांना ‘काटकसरीने व साधेपणाने राहा’ हे सांगण्यात काय हशील आहे? त्या गरिबीच्या सापळ्यातून बाहेर येऊन त्यांना त्यांचे भौतिक जीवन निदान सुसह्य व शक्यतो सुखाचे करायचे आहे. म्हणजेच त्यांना आपले जीवनमान सुधारायचे आहे. पर्यायाने आपल्या जगण्याच्या पद्धतीत, जीवनशैलीत त्यांना बदल हवा आहे. त्यासाठी ते धडपडत आहेत.

सामूहिक पातळीवर, अनेक जणांच्या जीवनमानात तसा बदल घडवून आणण्याचा प्रयत्न करणे म्हणजेच विकास साधणे, विकाससंबंधीच्या योजना आखणे, त्यासाठी वरवर खर्चिक वाटणारे प्रकल्प हाती घेणे. उदाहरणार्थ, वीजनिर्मितीसाठी मोठाली धरणे बांधावी लागतात, कोळसा वापरावा लागतो, अणुशक्तीचा वापर करावा लागतो, तेल वा नैसर्गिक वायूच्या मदतीने जनित्रे चालवावी लागतात. अशी वीजनिर्मिती केली नाही, तर गावातील रस्त्यांवर दिवे लागणार नाहीत, गावागावांत टीव्ही जाणार नाहीत, उद्योग उभे राहणार नाहीत. पर्यायाने बेकारी व दारिद्र्य दूर होणार नाही. इच्छा नसली तरी गरिबीतच जीवन कंठावे लागेल! परंतु प्रत्येकाच्या कुटुंबात, घरात, गावात, देशात समृद्धी आली म्हणजेच विकास झाला, अशी विकासाची सोपी व्याख्या करून चालणार नाही. जीवनमान सुधारले म्हणजे जीवनमूल्ये बदलतातच असे नाही. जीवनमान सुधारले तर जीवनशैली मात्र बदलू शकते.

समजा, आपल्या देशातील प्रत्येक कुटुंबाकडे एक मोटार आली, प्रत्येक कुटुंबाला स्वत:चा फ्लॅट वा बंगला मिळाला, तर आपल्या जीवनात नक्कीच केवढी तरी समृद्धी आली, असे आपण म्हणू. पण या समृद्धीचा अर्थ काय असेल? प्रचंड प्रमाणावर प्रदूषण! आज आपण वापरतो त्यापेक्षा एक हजार पटींनी जास्त पेट्रोल वापरू. आज जेवढे प्रदूषित वायू आपण हवेत सोडतो त्याहून हजारपटींनी प्रदूषण त्या वाहनांमुळे होईल. आज मुंबई, दिल्ली, कोलकाता इत्यादि शहरांतील ६५ ते ७० टक्के प्रदूषण वाहनांमुळे होते.

जर एक हजार पटींनी जास्त पेट्रोल वापरावे लागले, तर तितक्याच प्रमाणात परकीय चलन द्यावे लागेल. शिवाय हजार पटींनी दूषित झालेल्या हवेमुळे दमा, हृद्रोग, कॅन्सर अशा रोगांचा फैलाव होईल. म्हणजेच समृद्धीबरोबरच अधोगतीचा शाप येईल. याचाच अर्थ हा की, समृद्धी म्हणजे विकास नव्हे. विकास म्हणजे भरपूर पैसे वा चैनीच्या वस्तूंची रेलचेल नव्हे. विकास म्हणजे संतुलित प्रमाणात संपूर्ण समाजाच्या जीवनमानात वाढ. परंतु जीवनमूल्यांचे अवमूल्यन न करता विकास हा केवळ भौतिक नसतो, तर तो मानसिक, सांस्कृतिक, सामाजिक असा सर्वांगीण असतो. समृद्धी मात्र भौतिकच असते. म्हणूनच केवळ समृद्धीच्या मागे लागून विकास होणार नाही. विलासी जीवनशैलीला जीवनमूल्य प्राप्त होणार नाहीत.

यावरून हे सहज लक्षात येईल की, 'विलास' आणि 'विकास' हे परस्परविरुद्धच आहेत. समाजातील सर्वांचे जीवनमान उंचावले पाहिजे यासाठी आपण प्रयत्नशील असणे, याचा अर्थ असा नव्हे की, श्रीमंतांनी अतिश्रीमंत व्हावे, उच्च-मध्यमवर्गीयांनी श्रीमंत व्हावे. समाजातील तीव्र विषमता कमी कमी करीत आणणे हे विकासाचे अंग आहे, तर समृद्धीचाच मार्ग बेगुमानपणे चोखाळणे हे विकासाला अटकाव करणारे आहे.

किंबहुना असेही म्हणता येईल की, समाजातील काही लोकच श्रीमंत असणे याचा अर्थ काहींनी दारिद्र्यरेषेखालीच असायला हवे! परंतु दारिद्र्य हेच पर्यावरणवाद्यांसमोरील सर्वात मोठे आव्हान आहे. दारिद्र्य दूर करायचे तर सार्वत्रिक विकासाच्या प्रकल्पांना पाठिंबा द्यायलाच हवा आणि त्या विकासाची फळे मूठभरांच्याच हातात जाऊ नयेत म्हणून विषमताविरोधी चळवळही चालू ठेवायला हवी.

'लोकमत'च्या सौजन्याने

ketkarkumar@gmail.com.

●●●

## 'केस तर केस - भीमजयंतीला वाजणार २४ बेस'

*सुरेश सावंत*

चळवळ चिकित्सा युवा

१४ एप्रिल, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जयंतीचा दिवस .मध्यरात्रीपासूनच शुभेच्छांचे संदेश व्हॉट्सअपवर यायला सुरुवात झाली .त्यातला हा एकः 'केस तर केस-भीमजयंतीला वाजणार २४ बेस' या ओळी व खाली स्पीकर्सचे एकावर एक थर असलेला फोटो.

पाठवणाऱ्याला लिहिलेः 'मला हे मान्य नाही .आपण कायदा पाळायला हवा .इतरांना आपला त्रास होता कामा नये.' त्याचे उत्तर आलेः 'मलाही तसेच वाटते .आपल्या लोकांच्या काय भावना आहेत, हे कळावे, म्हणून तो फोटो पाठवला.'

दुपारीच याचा प्रत्यय आला .कानठळ्या बसवणारा डीजेचा आवाज जवळ येत गेला तसा अधिकच असह्य होऊ लागला .घराच्या भिंती कंप पावू लागल्या .छातीत धकधक होऊ लागले .घराबाहेर आलो .अर्थातच जयंतीची

मिरवणूक होती .मला आलेल्या संदेशासारखेच भल्या मोठ्या स्पीकर्सचे थरावर थर असलेले मोठे ट्रेलरसारखे वाहन अग्रभागी .त्याच्या मागे डीजेच्या तालावर बेधुंद नाचणारे तरुण .'आजचा दिवस आमचा आहे' ही भावना त्यातून ओसंडत होती .मिरवणुकीतले बाकी महिला-पुरुष घोषणा देत होते .पण या घोषणा डीजेच्या आवाजात कुठच्या कुठे हरवून जात होत्या.

काही काळ मिरवणुकीत चाललो .पण आवाज आणि उन्ह अगदीच असह्य व्हायला लागले .मग इतरांच्या नकळत हलकेच बाहेर पडलो .मिरवणूक लांब गेल्यावर आवाजही कमी झाला .अन् मी 'हुश्श' केले.

मी आता मध्यमवर्गीय आहे .वस्ती सुटली आहे .नुकतीच पन्नाशीही झाली आहे .उन्हाचा-आवाजाचा त्रास पहिल्यापेक्षा अधिक जाणवू लागला आहे .पण कार्यकर्ता असल्याने तसेच अनेक नातेवाईक तिथेच राहत असल्याने वस्तीशी माझे संबंध तुटलेले नाहीत .पण पूर्वीची हस्तक्षेपाची ताकद आता राहिलेली नाही; क्षीण झालेली आहे म्हणा फारतर .कारण केलेली सूचना अगदीच कोणी अव्हेरत नाही .कधीतरी एखादी अमलातही येते.

आंबेडकरी समूहात हे जे काही बदलते आहे, ते सर्वस्वी त्याचे वैशिष्ट्य नाही .भोवतालच्या समाजात जे वारे वाहते आहे, ते त्याच्याही काना-डोक्यात शिरत आहे .शिवाय काही बाबी खास त्याच्या स्वतःच्याही आहेत . गणपती-दहिहंडी-शिवजयंतीला जर २४ बेस डिजेच्या तालावर लोक बेहोश होत असतील, फटाक्यांची आतषबाजी, रोषणाईचा झगमगाट हेच उत्सवाच्या यशस्वीतेचे मानदंड ठरत असतील; तर मग आंबेडकर जयंतीही त्याच मानदंडांवर साजरी होणार .सगळंच आवाजी-झगमगाटी असेल, तर जयंतीही तशीच असणार .इतर जर कायदा उल्लंघत असतील, तर मग आमच्यावरही होऊ द्या केस, ही बेफिकीरी येते .अजूनही दलित-आंबेडकरी समुदायाच्या वाट्याला अत्याचार, अवमान, दुजाभाव येत असल्याने या बेफिकीरीला विद्रोहाचाही एक आयाम असतो, हे विसरुन चालणार नाही.

पण त्यामुळे हे योग्य ठरत नाही .ते सिगरेट ओढतात-दारु पितात ते चालते; मग मी हे केले तर काय वावगे झाले, हे समर्थन गैर आहे .जे कोणालाच हितावह नाही, ते दुसरा करतो म्हणून आपण करण्याने आपल्याला हितावह ठरत नाही.

हे लिहिताना जुन्या काळी सगळं कसं आदर्श होतं आणि आता सगळं ढासळत चाललं आहे, असा माझा आविर्भाव मुळीच नाही .आवाजाचे-रोषणाईचे तंत्र व आर्थिक क्षमता आजच्याच तेव्हा असत्या तर डीजे व थाटमाट तेव्हाही दिसणे अशक्य नव्हते .१३ एप्रिलच्या मध्यरात्री १२ वाजल्यानंतर १४ तारीख सुरु झाली की लाऊडस्पीकरचे भोंगे जे 'उद्धरली कोटी कुळे-भीमा तुझ्या जन्मामुळे' गायला लागायचे त्याने बिगर आंबेडकरी माणसाची खाडकन झोपच उडायची .ती त्या रात्री तरी पुन्हा लागणे कठीण होते .आमच्या अंगावर रोमांच उभे राहत, ते आम्ही त्या समाजाचे होतो म्हणून .आम्ही कोणी, खास करुन मुले त्या रात्री झोपतच नसू .पताका लावणे, भिंतीवर बाबासाहेबांच्या प्रतिमा रंगवणे, मंडपात पाणी मारणे, फलकावर जयंतीचा कार्यक्रम लिहिणे यात आम्हाला परमानंद मिळायचा .आता ही अनेक कामे पैश्यांनी आऊटसोर्स केली जातात.

फरक पडला आहे, तो प्रेरणांत .विचारांत .जीवनबदलाची एक विलक्षण ऊर्जा आमच्या धमन्यांतून सळसळत असायची .बाबासाहेबांचा ईश्वराला, आत्म्याला, पर्यायाने पुनर्जन्माला, चमत्कारांना नकार, बुद्धाचे स्वतः माणूस

असणे, माणसाला मध्यवर्ती कल्पिणे, स्वतःला मोक्षदाता नव्हे, तर मार्गदाता म्हणणे, भोवतालचा अंधकार दूर होण्यासाठी ‘अत्त दीप भव’ ((स्वतःच दीप हो ) हा स्वावलंबनाचा संदेश देणे, शाळेत शिकत असलेल्या विज्ञानाशी बुद्धविचारांची सुसंगतता दिसणे, ‘सब्बे सत्ता सुखि होन्तु’ च्या घोषात फक्त आपल्याच समाजाची नाही, तर अख्ख्या मानवतेच्या मांगल्याची कामना करणे...या सगळ्या भावना-जाणिवा त्या रात्री मनात एकवटायच्या .आम्ही खालचे, मागास नाही; तर बुद्ध-आंबेडकरी विचारांची एक प्रचंड श्रीमंती आमच्यात आहे, या जाणीवेने ती रात्र व पुढचे अनेक दिवस आम्ही तरंगत असू.

या प्रेरणा, जाणिवा आता आहेत, असे दिसत नाही .किमान सार्वत्रिक तरी नक्की नाहीत .अर्थात आमच्या वेदनांचा अनुभव वा त्यांची तीव्रता आताच्या मुलांमध्ये नाही, हेही कारण आहेच .पण नफा-नुकसानीच्या भाषेत बोलायचे, तर आर्थिक-भौतिक अभावग्रस्ततेत लक्षणीय घट झाली असली तरी जाणिवांचे दारिद्र्य हे खूप मोठे नुकसान आहे . बैलगाडीत बुद्ध-बाबासाहेब-फुल्यांच्या प्रतिमा व लेझिम अशा मिरवणुकांच्या जागी डीजेचा आवाजी, झगमगाटी बदल हे एकवेळ चालू शकेल .पण त्यावेळी होणाऱ्या व्याख्यानमाला आता अपवादानेच होतात .आंबेडकर, गांधी, मार्क्स यांतील मतभेद कोणते, मूर्तिपूजा नाकारणाऱ्या बुद्धाची मूर्ती बाबासाहेबांनी स्वीकारण्यामागचे कारण काय, देवाची पूजा आणि बुद्धाची पूजा यातला फरक, अगरबत्ती, मेणबत्ती, फुले यांचे प्रतीकात्मक अर्थ, मंगळसूत्र घालायचे की नाही, कुंकू लावायचे की नाही...अशा चर्चांनी तेव्हा रात्री उजाडायच्या .बोलणारे बोलायचे .बाकीचे रस घेऊन ऐकत असायचे .आताच्या मुलांना हे प्रश्न ग्रासतात, असे दिसत नाही .स्मार्ट फोनवर बाबासाहेबांची पूजा बांधणारे अविवेकी संदेश, फोटो मात्र शेअर होत असतात .विभूतिपूजेच्या विरोधात असलेल्या बाबासाहेबांची ‘गर्व से कहो’चालीवर यथासांग डिजिटल पूजा होत असते .एक जीवनप्रणाली, जीवन व चळवळ उन्नत करण्याचे वैचारिक साधन याअर्थाने बाबासाहेबांनी बौद्ध हा धर्म नसून धम्म आहे, असे म्हटले होते .आज त्याला व्यवस्थित धर्माचे स्वरुप आले आहे . त्याच्याविषयी थोडे अधिक बोलू.

बाबासाहेबांनी बौद्ध धम्माची दीक्षा १४ ऑक्टोबरला दिली आणि जेमतेम दीड महिन्यात ६ डिसेंबरला त्यांचे महापरिनिर्वाण झाले .बौद्ध धम्माच्या आचरणाविषयी त्यांना नीट आखणी करायला तसा वेळच मिळाला नाही .काही तयारी त्यांनी आधीपासून केली होती .त्यामुळे किमान ‘बुद्ध आणि त्याचा धम्म’ हा ग्रंथ सिद्ध झाला .विधिंविषयी वगैरे काही भाषणांत उल्लेख केलेले होते .त्या सगळ्याबाबत बाबासाहेबांच्या नंतरच्या नेत्यांनी एकवाक्यतेने काही ठरवायला हवे होते .राजकीय बाबतीतला त्यांचा कर्मदरिद्रिपणा इथेही दिसतो .धार्मिक संस्था निघाल्या .पण त्याही बव्हंशी राजकीय पंखाखालीच राहिल्या .धार्मिक बाबतीत दिशादिग्दर्शन करणारी आंबेडकरी बौद्धांची मध्यवर्ती मान्यता असलेली एकच एक संस्था नाही.

‘बुद्ध आणि त्याचा धम्म’ या ग्रंथाचे काही ठिकाणी ग्रंथ लावल्यासारखे ‘पठन’ केले जाते .या ग्रंथाची पारायणे केलेले लोक मला भेटतात .पण या ग्रंथातला नेमका एक भाग वाचायचा विसरतात, तो म्हणजे ‘परिचय’. ग्रंथाच्या प्रारंभी असलेल्या या छोटेखानी परिचयात बाबासाहेब बौद्ध धम्माच्या प्रसारात ज्यामुळे अडथळा येतो असे काही मूलभूत प्रश्न उपस्थित करतात .त्या सगळ्यांचा इथे उल्लेख करत नाही .फक्त एकच करतो .तो म्हणजे भिख्खू संघाचा . त्यांच्या काळातील पारंपरिक भिख्खूंचे ऐषारामी राहणे त्यांना खटकत असे .भिख्खूंचे समाजापासून तुटणे हे बौद्ध धर्माच्या ऱ्हासाचे एक कारण ते समजत .ते भिख्खूंच्या भूमिकेविषयी साशंक होते .तो एक पूर्णपुरुष असेल तर

समाजाला त्याचा काही उपयोग नाही, भिख्खू हा सामान्य माणसाचा मित्र, तत्त्वज्ञ व मार्गदर्शक असायला हवा, असे ते या परिचयात म्हणतात .त्यांच्या दृष्टीने तो एक पूर्णवेळ कार्यकर्ता आहे .तो उच्चासनावर बसणारा, विधी लावणारा पुरोहित नव्हे .बाबासाहेबांनी नागपूरला दीक्षासमारंभात महास्थवीर चंद्रमणींच्या हस्ते स्वतः पत्नीसह दीक्षा घेऊन परंपरेशी नाते जोडले .मात्र समोरच्या लाखोंच्या समुदायाला त्यांनी स्वतः दीक्षा दिली .चंद्रमणींच्या हस्तेच समाजाला दीक्षा दिली असती, तर दीक्षा किंवा कोणताही धार्मिक विधी करण्यासाठी भिख्खूचीच गरज असते, असे समाजाला वाटले असते व एक नवा चिवरधारी पुरोहित तयार झाला असता, असे बाबासाहेबांनी याचे स्पष्टीकरण दिले आहे . कोणीही उपासक कोणतेही विधी लावू शकतो .त्यासाठी भिख्खूची गरज नाही, हे सूत्र त्यांनी इथे समाजाला दिले .दीक्षा समारंभाला लाखो लोक होते .पण सगळा समाज काही तेथे नव्हता .त्याला कोण दीक्षा देणार? त्यासाठी दरेकाने दरेकाला दीक्षा द्यावी, असे त्यांनी सांगितले .माझ्या वडिलांनी मुंबईच्या कामगार मैदानात झालेल्या दीक्षा समारंभात बॅरिस्टर भंडारेंच्या हस्ते दीक्षा घेतली.

आजही विधी लावण्याचे काम सामान्यांतलाच एकजण विधिकर्ता ( बौद्धाचार्य असे चुकीचे नाव त्याला पडले आहे ) म्हणून करतो .तथापि, थोडी अर्थसंपन्नता आलेला यजमान यासाठी भिख्खूला पाचारण करण्यात, त्याला उच्चासनावर बसवून, मंतरलेला धागा मनगटात बांधून विधी करण्यात प्रतिष्ठा मानताना दिसतो आहे .त्याचे अनुकरण मग सामान्य आर्थिक कुवतीचाही माणूस करताना आढळतो .बुद्धविचारांचे मार्गदर्शन, प्रवचन, प्रचार-प्रसार याच कामाला पूर्ण वाहून घेण्याऐवजी अशा विधी लावण्याच्या कामांत भिख्खूंचे जथे सामील होताना दिसू लागले आहे . 'वंदामि भन्ते'तील ज्येष्ठ मित्राला आदरार्थी करावयाच्या संबोधनात आता लीनता येऊ लागलेली आहे .यथावकाश भिख्खूंचे ऐषारामी मठ उभे राहिल्यास आश्चर्य वाटू नये .लग्न साधेपणाने करावयाचा बाबासाहेबांचा संदेशही उधळला जावू लागला आहे .थाटमाट व प्रतिष्ठेचे सगळे संकेत खास करुन मध्यम व उच्च मध्यमवर्गीय आंबेडकरी समुदायांत रुजायला सुरूवात झाली आहे .बुद्धाने प्रचारासाठी संस्कृतऐवजी पाली ही लोकभाषा निवडली .आज पाली लोकभाषा नाही .तरी विधिची सूक्ते पालीतच म्हटली जातात .त्यांचा मराठी अनुवाद करण्याचे प्रयत्न झालेच नाहीत असे नाही . पण काहीही कळले नाही तरी पालीत म्हणण्यालाच आज प्रतिष्ठा आहे.

बाबासाहेबांच्या सामाजिक क्रांतीचे भले परिणाम अनुभवणाऱ्या मला हे प्रतिक्रांतीचे संकेत अस्वस्थ करतात . अर्थात, पुढे काय होणार याची केवळ चिंता वाहण्याऐवजी आपल्याला वाटणारा हस्तक्षेप करत राहणे, हेच श्रेयस्कर असते .ते करण्याचा यत्न मी करत असतो .यावेळी १३ एप्रिलला रात्री १२ वा .मला एका वस्तीत पाहुणा म्हणून बोलावले होते.( हल्ली असे बोलावणे कमी झाले आहे. ) रात्री १२ च्या ठोक्याला माझ्या हस्ते ध्वजारोहण झाले . बुद्ध-बाबासाहेबांच्या प्रतिमांना हार घातले गेले .नंतर काही काळ फटाक्यांची आतषबाजी .नंतर वंदना .पूजा पाठ . आणि मग माझे भाषण .वर जे लिहिले ते आणि इतर बरेच बोललो .आगामी वर्ष बाबासाहेबांच्या जयंतीचे १२५ वे आहे .ते साजरे करण्याकरता शेवटी मी काही कार्यक्रम सुचवला .पहाटे घरी परतलो .दुसऱ्या दिवशीच्या मिरवणुकीतल्या '२४ बेसला' घाबरुन घरी आलो .आणि थोड्याच वेळात रात्रीच्या आयोजकांचा फोन आला .ते म्हणाले -"तुमच्या भाषणावर आम्ही कार्यकर्ते चर्चा करत बसलो होतो .आम्हाला तुमचे पटले .आम्ही दर पौर्णिमेला एक प्रबोधनपर कार्यक्रम ह्या वर्षी नियमतिपणे घ्यायचे ठरवले आहे .तुमचे मार्गदर्शन मात्र लागेल".

आता माझी जबाबदारी आहे, हे वर्षभराचे कार्यक्रम त्यांना सुचवणे व ते उद्दिष्टानुरुप होतील, यासाठी प्रयत्न करणे . ही जबाबदारी मी आनंदाने पार पाडेन.

साभारः आंदोलन शाश्वत विकासासाठी, मे २०१५

sawant.suresh@gmail.com

●●●

# जमिनीची किंमत 'मोजणार' कशी?

*मिलिंद मुरुगकर*

कायदा खाउजा राजकारण

भूसंपादन वटहुकमाच्या बाजूने 'औद्योगिक विकास', तर त्याच्या विरोधात 'अन्नसुरक्षेला धोका' असे मुद्दे घेऊन राजकीय प्रचार केला जात असताना एका कळीच्या प्रश्नाकडे दुर्लक्ष होते आहे. 'जमिनीच्या किमतीचे मापन कशा प्रकारे केले असता जमीनधारकाचे आर्थिक समाधान होईल किंवा शेतकऱ्याला त्याच भागात पर्यायी जमीन घेता येईल?' हा तो प्रश्न. आपल्या देशातील मुद्दा किमतीच्या मापनापेक्षाही जमिनीची 'खरी किंमत शोधण्याचा' आहे आणि इथे शेतकऱ्यांना पुढाकार घेऊ देणे, हा तज्ज्ञांनी सुचवलेला उपाय किमान चार वर्षे राजकीय चर्चेत आलेलाच नाही.

जमीन अधिग्रहण विधेयकावरील पंतप्रधानांचे भाषण (मन की बात) हा राजकीय संवादकौशल्याचा एक उत्तम नमुना होता. पण पंतप्रधानांच्या या प्रयत्नाला यश येईल का, याबद्दल साशंकता वाटण्याचे प्रमुख कारण म्हणजे पंतप्रधानांच्या भावनिक आवाहनात औद्योगिकीकरणामुळे निर्माण होणाऱ्या नोकऱ्यांचे जे आश्वासन आहे ते 'भविष्यात' साकार होऊ शकते.. पण शेतकऱ्याची जमीन 'आज' विकावी लागणार आहे. प्रश्न असा आहे की, जमीन अधिग्रहण कायदा हा शेतकऱ्यांना भौतिकदृष्ट्या आजच्यापेक्षा उद्याचे जीवन जास्त चांगले होण्याची सुवर्णसंधी का वाटू नये?

असे होण्यासाठी आपल्याला खुल्या बाजारपेठेच्या तत्त्वाचा आधार घ्यावा लागेल. जमिनीची किंमत ठरवण्याचे अधिकार सरकारकडून काढून घ्यावे लागतील. पण या पर्यायाकडे वळण्याअगोदर आज जमीन अधिग्रहण कायद्याच्या चर्चेवर दाटलेले विचारसरणीचे मळभ दूर करणे आवश्यक आहे. विचारसरणीच्या (आयडियालॉजी) प्रभावापासून आपण मुक्त नसतो. कारण विचारसरणी आपण मानत असलेल्या मूल्यांच्यादेखील वाहक असतात. पण हा प्रभाव आपल्या चिकित्सक वृत्तीच्या आणि समस्येवर व्यवहार्य उपाय शोधण्याच्या आड येता कामा नये. पण आज तसे होताना दिसते. औद्योगिकीकरणाचा वेग वाढवणे आणि शेतकऱ्यांच्या हिताची भूमिका घेणे या जणू परस्परविरोधी गोष्टी असल्याचे भासवले जात आहे.

'शेतकऱ्यांकडून जमीन घेण्याऐवजी जर शेतीविकासासाठी आवश्यक सुविधा शासनाने पुरविल्या तर शेतीतच रोजगार उपलब्ध होईल.' अशासारखेच दुसरे विधान केले जाते ते म्हणजे 'जर शेतजमीन औद्योगिकीकरणासाठी वापरली तर अन्नधान्य उत्पादनातील देशाची स्वयंपूर्णता धोक्यात येईल.' या दोन्ही विधानांत मोठा तर्कदोष आहे.

उद्योगधंदे हे काही 'जमीन सघन' (लँड इंटेन्सिव्ह) नसतात. औद्योगिकीकरणाला लागणारी जमीन ही देशाच्या धान्योत्पादनाला लागणाऱ्या जमिनीपेक्षा खूपच कमी असते. त्यामुळे ही भीती अनाठायी आहे. त्यामुळेच औद्योगिकीकरणासाठी जमीन वापरली जाणे आणि शेतीविकासासाठी सुविधा निर्माण करणे यातही परस्परविरोधी काही नाही. दोन्ही गोष्टी गरजेच्या आहेत. शेतीवर बहुसंख्य लोक अवलंबून आहेत. त्यांची क्रयशक्ती वाढून औद्योगिक मालाला मागणी वाढायची असेल आणि त्यामुळे औद्योगिक विकास साधून रोजगारनिर्मिती साधायची असेल तर शेतीविकासाला चालना देणे आवश्यकच आहे.

दुसरीकडे नव्या भूसंपादन विधेयकाचे समर्थन करणारे लोक शेतकऱ्यांना समजावत आहेत की, तुमच्या मुलाबाळांना जर रोजगार हवा असेल तर तुम्ही जमीन द्यायला तयार असले पाहिजे. हे म्हणणेदेखील दिशाभूल करणारे आहे. येथे हे गृहीत धरले आहे की, जणू काही शेतकरी हा औद्योगिकीकरणाच्या विरोधी आहे. शेतकरी शेती व्यवसाय म्हणून करतो. त्याला आजपेक्षा उद्या चांगले जीवन जगण्याची संधी दिसत असेल, म्हणजेच जमिनीला चांगली किंमत मिळत असेल तर तो आपली जमीन निश्चितपणे विकायला तयार होईल. तेव्हा शेतकऱ्याला हे व्यापक तत्त्वज्ञान सांगणे ही त्याला राजकीय चलाखी वाटली तर त्यात आश्चर्य नाही.

अर्थशास्त्रीय भाषेत बोलायचे झाल्यास जमीन ही एक दुर्मीळ संसाधन आहे. जमीन निर्माण होत नाही. त्यामुळे अशा दुर्मीळ संसाधनाच्या धारकाला त्या संसाधनाची बाजारात चढी किंमत मिळणे हा खुल्या बाजारपेठेचा नियम आहे. पण दुर्दैवाने आपल्या जमिनीची खुली बाजारपेठच अस्तित्वात नाही. जमिनीच्या व्यवहारातील प्रत्यक्षातील किमती आणि सरकारदरबारी त्या व्यवहाराच्या नोंदलेल्या किमती यात प्रचंड फरक असतो. कारण जमिनीच्या खरेदीविक्रीचे व्यवहार हे मुद्रांक शुल्क चुकवण्यासाठी नेहमीच काळ्या पशात होतात. त्यामुळे या किमतींना बाजारभावाची किंमत मानणे हेच अतार्किक आहे. याला कोणताच शास्त्रीय आधार नाही. क्षणभर आपण असे गृहीत धरू की, देशात जमिनीची खुली बाजारपेठ अस्तित्वात आहे. मग प्रश्न सोपा होता.. जमिनीची किंमत सरकारने म्हणजे एखाद्या सरकारी अधिकाऱ्याने ठरवण्याचा प्रश्नच नव्हता. कारण बाजारपेठ (मार्केट) किंमत 'शोधून काढत' असते (प्राइस डिस्कव्हरी). उद्योगांनी अनेक शेतकऱ्यांशी वाटाघाटी करणे व्यवहार्य नसल्यामुळे सरकारची भूमिका ही उद्योगसमूह आणि शेतकरी यांच्यामधील 'प्राइस डिस्कव्हरी'साठीचा दुवा इतकीच राहिली असती.

सरकार जर खुल्या बाजारपेठेच्या बाजूचे असेल तर जमिनीचा मोबदला शेतकऱ्यांना आधी ठरवलेल्या किमतीनुसार देण्याऐवजी बाजारपेठेने 'शोधलेल्या' किमतीने मिळणे आवश्यक आहे. कोणताही माणूस आपल्याकडील वस्तू त्याला त्या वस्तूच्या त्याला वाटणाऱ्या 'मूल्या'पेक्षा तिची बाजारातील किंमत जास्त आहे असे वाटत नाही, तोपर्यंत ती वस्तू विकत नाही. पण बाजारातील किंमत काय हे ठरवायचे कसे? समजा, एखाद्या उद्योगसमूहाला पाचशे एकर जमीन हवी आहे. तिथे उद्योग येणार म्हटल्यावर आजूबाजूच्या जमिनीच्या किमतीही अनेक पटींनी वाढतात. कारण या सर्वच जमिनीमधून संपत्ती निर्मितीची क्षमता विविध कारणांनी वाढते. आता ज्या शेतकऱ्यांच्या जमिनी या उद्योगसमूहांनी घेतल्या त्या शेतकऱ्यांनादेखील या वाढीव किमतीचा फायदा मिळाला पाहिजे. तो त्यांना मिळाला हे ठरवण्याचा एकमेव विश्वासार्ह निकष म्हणजे ज्या शेतकऱ्याला जमीन विकायची नाही किंवा हवीच आहे, त्या शेतकऱ्याला मिळालेल्या मोबदल्यातून प्रकल्पाशेजारील जमीन घेता आली पाहिजे. या मोबदल्यापेक्षा कमी किंमत देऊन शेतकऱ्याकडून जमीन काढून घेणे हे पूर्णत: अन्याय्य आहे. एखाद्या नागरिकाकडून सरकारने त्याची कार काढून

घेतली आणि त्याला बाजारभावाने त्या गाडीची किंमत दिली तर तो नागरिक अगदी तशीच दुसरी कार विकत घेईल. पण जमिनीचे तसे होत नाही. कारण जमिनीची खऱ्या अर्थाने खुली बाजारपेठच नाही.

मग अशा परिस्थितीतदेखील 'किंमत शोधण्याची' खुल्या बाजाराची ताकद आपल्याला वापरता येईल का? हे साधण्याचा एक ठोस पर्याय गेली काही वर्षे अर्थतज्ज्ञांच्या चर्चेत आहे. ज्या शेतकऱ्यांना जमीन विकायची आहे त्यांना त्यांच्या मनात (त्यांच्या हिशेबाप्रमाणे) त्या जमिनीचे जे मूल्य असेल त्यापेक्षा अधिक किंमत देणारा आणि ज्यांना जमीन विकायची नसेल त्यांना प्रकल्पाभोवतालची जमीन मोबदला म्हणून देण्याचा हा उपाय होय. 'लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स'मधील अर्थतज्ज्ञ मत्रीश घटक आणि 'दिल्ली स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स'मधील परीक्षित घोष यांनी २०११ पासून सुचवलेला हा उपाय पुढीलप्रमाणे : एखादा प्रकल्प येणार असे जाहीर झाल्यावर त्या प्रकल्पाच्या जागेखालील आणि आजूबाजूची जमीनदेखील सरकारने लिलावाद्वारे विकत घ्यावी. सर्व जमीनधारकांनी त्यांना त्यांच्या जमिनीची किती किंमत मिळाली पाहिजे ते टेंडरच्या माध्यमातून सांगावे. यापकी प्रकल्पाला लागेल इतकी सर्वांत कमी किमतीची जमीन सरकारने शेतकऱ्याकडून विकत घ्यावी आणि ही किंमत तळातील टेंडर्सपैकी, पण सर्वात जास्त किंमत असलेल्या टेंडरची किंमत असेल. म्हणजे सर्वच शेतकऱ्यांना त्यांनी मागितलेल्या किमतीपेक्षा जास्त किंमत मिळेल. यातील काही जमीन ही प्रकल्प ज्या ठिकाणी होणार तेथील असेल, काही प्रकल्पाच्या आसपासची असेल. प्रकल्प जिथे होणार असेल तेथील ज्या शेतकऱ्यांची जमीन लिलावाद्वारे विकत घेतली जाणार नाही (त्यांनी सांगितलेली किंमत जास्त असल्यामुळे) त्यांना सरकार प्रकल्पाबाहेर विकत घेतलेली जमीन मोबदला म्हणून देईल. म्हणजे त्यांना जमिनीच्या बदल्यात जमीन मिळेल. या पर्यायात सरकारची भूमिका केवळ जमिनीचे लिलाव घडवून आणणारे मध्यस्थ एवढीच असेल. लिलावाची व्यवस्था निर्माण करण्यासाठीचा खर्च हा उद्योगसमूहांनी करायचा आहे. ही व्यवस्था गुंतागुंतीची वाटली तर त्याचे एकमेव कारण म्हणजे हा पर्याय अद्याप नवीन आहे. प्रत्यक्षात आज ज्या पद्धतीने जमिनीचे अधिग्रहण होते त्यात कमालीची अपारदर्शकता आणि गुंतागुंत आहे. या व्यवहारात सरकारी अधिकारी आणि राजकीय नेते यांचीच चांदी होते असा आजवरचा अनुभव आहे.

येथे दोन प्रश्न उपस्थित केले जाऊ शकतात. एक म्हणजे कागदावर जो पर्याय निर्दोष वाटतो तो प्रत्यक्षात तसा ठरेलच याची खात्री काय? याचे उत्तर असे की लोकशाहीचे सामर्थ्यच हे आहे की यात प्रयोगशीलता आहे. निदान तत्त्वत: तरी. प्रयोगाच्या पातळीवर का होईना, खुल्या बाजाराची 'किंमत शोधण्याची' ही ताकद वापरून पाहायला हवी.

दुसरा प्रश्न असा उपस्थित केला जाऊ शकतो की, आताच्या राजकीय परिस्थितीत हा पर्याय अप्रस्तुत नाही का? याचे उत्तर असे की, जमीन अधिग्रहण कायदा २०१३ असो किंवा मोठ्या राजकीय संघर्षानंतर नवीन येणारा कायदा असो, हा प्रश्न एक ज्वलंत राजकीय प्रश्न म्हणून राहणे अपरिहार्य आहे. कारण या कायद्यांचा पायाच कोणताही तार्किक आधार नसलेला म्हणजे यादृच्छिक (ऑर्बिटरी) आहे. त्यामुळे राजकारणाला उदंड 'स्कोप' असणार आहे. त्यामुळे आज नाही उद्या तरी आपण खुल्या बाजारपेठेवर आधारित जमिनीची किंमत शोधणाऱ्या पर्यायाकडे वाटचाल करू, अशी अपेक्षा करायला निश्चित आधार आहे. पण असे होण्यासाठी 'तुम्ही जमीन दिली नाही तर औद्योगिक विकास कसा साधणार?' असा धूर्त प्रश्न शेतकऱ्यांना विचारणे किंवा उद्योगासाठी जमीन गेली तर देशाची धान्य स्वयंपूर्णता धोक्यात येईल, असे म्हणून आपली विचारसरणी दामटणे हे मात्र थांबवले पाहिजे.

'लोकसत्ता'च्या सौजन्याने

milind.murugkar@gmail.com

# धोरणशून्य ‘स्मार्ट’पणा काय कामाचा?

*अभय टिळक*

अर्थकारण शहरीकरण चिकित्सा

जगातील लोकसंख्येच्या जडणघडणीने २००८मध्ये कूस बदलली. निम्म्याहून अधिक जग त्या वर्षात ‘शहरी’ बनले. शहरांची निर्मिती आणि विस्तार व सर्वसाधारण आर्थिक विकास यांचा संबंध जैविक स्वरूपाचा आहे. किंबहुना, ‘विकासाची इंजिने’ असेच शहरांना संबोधले जाते. १९५०मध्ये जगाच्या तत्कालीन एकंदर लोकसंख्येपैकी सरासरीने ३० टक्के लोकसंख्या शहरी होती. आता, २०५०मध्ये शहरीकरणाची हीच सरासरी पातळी ६६ टक्क्यांवर पोचेल, असा अंदाज वर्तविण्यात येतो आहे. येत्या ३५ वर्षांचा विचार केला तर जगातील शहरी लोकसंख्येमध्ये सुमारे २५० कोटींची भर पडेल, असे चित्र मांडले जाते. महत्त्वाची गोष्ट म्हणजे भविष्यातील शहरी लोकसंख्येच्या या अंदाजित वाढीपैकी जवळपास ९० टक्के वाढ आशिया आणि आफ्रिका या केवळ दोनच खंडांत कोंदटलेली असेल. या प्रचंड शहरी वाढीचे व्यवस्थापन करताना देशेदेशींच्या धोरणकर्त्यांची आणि नगरनियोजनकारांची खरोखर कसोटी लागणार आहे.

विस्मयाची बाब म्हणजे, याबाबत भारतात कोणत्याही प्रकारच्या गंभीर चिंतनाचा घाऊक अभाव दिसतो. नागरीकरणाची प्रक्रिया आपल्या देशात झपाट्याने वेग पकडते आहे. राज्याराज्यांतील शहरीकरणाच्या वाढविस्तारात तर मोठी असमानता दिसते. तुलनेने कमी काळात झालेल्या वेगवान शहरीकरणामुळे शहरांच्या व्यवस्थापनाचे कडवे आव्हान नागरीकरणाच्या प्रक्रियेत आघाडीवर असलेल्या राज्यांच्या पुढ्यात उभे ठाकलेले आहे. देशातील एकंदर शहरी लोकसंख्येपैकी निम्म्याहून जास्त शहरी लोकसंख्या आंध्र प्रदेश, गुजरात, महाराष्ट्र, कर्नाटक, तमिळनाडू आणि पश्चिम बंगाल या सहा राज्यांत एकवटलेली आहे. त्याच्याही पुढील गंभीर बाब म्हणजे या एकूण शहरी लोकसंख्येचे लहानमोठ्या आकारमानाच्या शहरांदरम्यानचे वाटप भयानक विषम आहे. २०११ सालच्या जनगणना आकडेवारीनुसार देशातील एकंदर शहरी लोकसंख्येपैकी ७० टक्क्यांहून अधिक लोकसंख्या एक लाख अथवा त्यांपेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या शहरांमध्येच एकवटलेली आहे.

आकारमानाने मोठ्या शहरांमध्ये सतत चालू असलेले शहरी लोकसंख्येचे केंद्रीकरण आणि अशा शहरांच्या संख्येत घडून येत असलेली वाढ, हे धोरणकर्त्यांपुढचे जटिल आव्हान आहे. शहरांच्या वाढीसंदर्भात ‘इंडियन इन्स्टिट्यूट फॉर ह्यूमन सेटलमेन्ट्स्’ या संस्थेच्या अलीकडच्या अहवालातील आकडेवारी मननीय आहे. १० लाखांपेक्षा अधिक लोकसंख्या असणाऱ्या शहरांची १९५१मध्ये संख्या होती अवघी पाच. २०११ सालच्या जनगणनेनुसार तीच संख्या आता पोचलेली आहे ५३च्या घरात. देशाच्या ठोकळ उत्पादनापैकी जवळपास ४३ टक्के ठोकळ उत्पादन निर्माण होते ते लोकसंख्येनुसार मांडलेल्या शहरांच्या उतरंडीतील सर्वांत वरच्या १०० शहरांमध्ये. एकूण लोकसंख्येमध्ये १६ टक्क्यांचा वाटा असणाऱ्या या १०० शहरांनी देशाच्या एकंदर भूभागापैकी अवघा ०.२४ टक्के भूभाग व्यापलेला आहे. लोकसंख्येच्या दृष्टीने पहिल्या १०मध्ये जमा होणारी शहरे देशाच्या एकंदर ठोकळ उत्पादनापैकी १५ टक्के उत्पादन निर्माण करतात. ‘ग्रोथ इंजिन्स’ असे या शहरांचे वर्णन रास्त ठरत असले तरी त्यांनी व्यापलेला एकूणांतील भूभाग आहे केवळ ०.१ टक्का इतका! ‘विकासाची इंजिने’ म्हणून गौरवास पात्र ठरणाऱ्या या शहरांमध्ये लोकसंख्या, उद्योगधंदे, घरे, व्यापार, गुंतवणूक, वाहने यांचा केवढा प्रचंड गजबजाट झालेला असेल यांची

कल्पना येण्याच्या दृष्टीने ही आकडेवारी पुरेशी बोलकी आहे. या पद्धतीने हातपाय पसरणाऱ्या बेडौल शहरीकरणास काही किमान शिस्त लावण्यासाठी आपल्यापाशी काय धोरणदृष्टी आहे? आजवर शहर विकासाचे काय धोरण आपल्यापाशी होते?

खरे म्हणजे, शहरीकरणाच्या वाढविस्ताराचे कोणतेही सुविहित, स्पष्ट धोरण आजपर्यंत आपल्याकडे उत्क्रांत न झाल्यामुळेच ही दुरवस्था आहे. शहर विकास हा आपल्या संघराज्य व्यवस्थेमध्ये राज्यांच्या अखत्यारीतील विषय आहे. त्यामुळे, शहरीकरणाचे धोरण तयार करून राबवणे ही मुख्यतः राज्य सरकारांची जबाबदारी ठरते. मात्र, त्याबाबतीत राज्याराज्यांत केवळ ठणठणातच दिसतो! नागरीकरणाच्या विकासाला शिस्त लावून दिशा देण्याबाबत धोरणात्मक पावलांचा अभाव राहिल्याने राज्याराज्यांतील शहरीकरण त्याच्या अंगभूत गुणदोषांसह हातपाय पसरत आलेले आहे. मोठ्या शहरांमध्ये होणाऱ्या लोकसंख्या, व्यापारउद्योग, गुंतवणूक यांच्या केंद्रीकरणाला आळा घालण्याचे प्रयत्नच होत नसल्याने त्या प्रवृत्तीला बळकटी येते आहे. आता, आर्थिक पुनर्रचना पर्वादरम्यान औद्योगिक गुंतवणुकीच्या स्थानांकनावरचे निर्बंध हटल्याने पूर्वापार विकसित झालेल्या आर्थिक-औद्योगिक केंद्रांभोवतीच एकवटण्याच्या औद्योगिक गुंतवणुकीच्या स्वाभाविक प्रवृत्तीला नव्याने धुमारे फुटत आहेत. लोकसंख्येच्या आकारमानानुसार रचल्या जाणाऱ्या शहरांच्या उतरंडीमध्ये मधल्या आणि तळाच्या स्तरांतील शहरांच्या सुविहित वाढीसाठी केंद्रीय स्तरावरून ठोस म्हणावा असा आजवर एकदाच प्रयत्न झाला. मध्यम व लहान आकारमानांच्या शहरांच्या एकात्मिक वाढीसाठी सहाव्या पंचवार्षिक योजनेदरम्यान एक कार्यक्रम राबविला गेला. बस्स! त्यानंतर काहीच नाही. त्यानंतर आर्थिक पुनर्रचनेचे पर्व देशात घुमू लागले आणि तेव्हापासून ‘विकेंद्रीकरण’ या संज्ञेची सगळ्या चर्चाविश्वातून तिच्या संकल्पनेसह उचलबांगडीच झालेली आहे.

अस्ताव्यस्त वाढलेल्या मोठ्या शहरांमधील बोजवारा उडालेल्या पायाभूत सेवासुविधांचा डोलारा सावरण्यासाठी संयुक्त पुरोगामी आघाडी सरकाने २००५-०६ या वर्षापासून जवाहरलाल नेहरू नागरी पुनर्निर्माण अभियान सुरू केले. पायाभूत सेवासुविधांसाठी स्थानिक स्वराज्य संस्थांना करण्यात यावयाच्या अर्थसाहाय्यासाठी देशातील ज्या ६३ शहरांची या अभियानांतर्गत निवड झाली, त्या सर्व शहरांची लोकसंख्या पाच लाख ते ४० लाखांदरम्यान होती. म्हणजे, या अभियानाचा ‘फोकस’ पुन्हा मोठ्या शहरांवरच होता. आता, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकार तर त्याहीपुढचे स्वप्न पाहते आहे. या सरकारला वेध लागलेले आहेत. ‘स्मार्ट’ शहरांचे! या ‘स्मार्ट’ योजनेंतर्गत समाविष्ट व्हावयाच्या १०० शहरांची लोकसंख्याही प्रत्येकी पाच लाख ते ४० लाखांच्या दरम्यानच बहुशः राहणार आहे. त्यासाठी येत्या २० वर्षांत सात लाख कोटी रुपयांची गुंतवणूक प्रस्तावित आहे. हीच रक्कम मधल्या स्तरावरील वा लहान आकारमानांच्या शहरांचे रंगरूप बदलण्यासाठी वापरली तर बेबंदपणे फुगलेल्या मोठ्या शहरांमध्ये वाहणारे लोंढे थांबवण्याची प्रवृत्ती अंकुरेल तरी. परंतु, आपल्याला मुख्य रस आहे तो चमकदार ‘योजनां’मध्ये. ‘योजना’ (स्कीम) आणि ‘धोरण’ (पॉलिसी) या दोहोंत मूलभूत फरक आहे, हे आपण लक्षात घेणार की नाही? शहरीकरणाच्या कोणत्याही स्पष्ट व तर्कशुद्ध धोरणाविना काही मोजकी शहरे तेवढीच ‘स्मार्ट’ बनवण्याचा अट्टहास सध्याची असमान शहरी वाढ वेगवान बनवेल त्याचे काय? बजबजलेल्या शहरांच्या उतरंडीला ‘स्मार्ट’ टोपी तेवढी चढवण्यात काय हशील?

सकाळच्या सौजन्याने

ispe@vsnl.net,

# स्वप्रतिमेच्या प्रेमात काही थोर भारतीय

*रामचंद्र गुहा*

चिकित्सा जीवनशैली

नरेंद्र मोदी आणि बराक ओबामा यांच्या अलीकडील भेटीत नरेंद्र मोदींनी घातलेल्या पोषाखाची चर्चा बरीच गाजली. त्यांनी जो सूट परिधान केला होता, त्यावर त्यांच्या नावाच्या नक्षीचे पट्टे होते. त्यावरील टीका अप्रस्तुत नव्हती. त्यांच्या पोषाखात दिखाऊपणा, भोंगळपणा तर होताच; तरीही मोदींचे त्यांच्या पेहरावातून दिसणारे स्वयंप्रेम हे आपल्याकडील किती तरी ताकदवान आणि यशस्वी भारतीय पुरुषांच्या सामाजिक वर्तणुकीचे अनुकरण होते, याचा पुन्हा एकदा प्रत्यय आला.

याचे पहिले उदाहरण भारताच्या सुप्रसिद्ध आणि अनेक सन्मानांनी अलंकृत शास्त्रज्ञ सी.एन.आर.राव यांचे देता येईल. ते जगातील एका प्रतिष्ठित वैज्ञानिक संस्थेचे सदस्य (फेलो) आहेत आणि आपल्या देशातील सर्वोच्च मानाचा पुरस्कार 'भारतरत्न' त्यांना अलीकडेच मिळाला आहे. काही वर्षांपूर्वी बंगलोरमधील त्यांच्या एका चाहत्याने तेथील इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स - ज्याचे प्रा.राव एक संचालक आहेत - या संस्थेसमोरील एका वर्तुळाकार बागेला त्यांचे नाव देण्यात यावे, अशा आशयाचा प्रस्ताव महापालिकेत संमत करून घेतला. आपल्या देशात उद्याने, रस्ते किंवा चौक यांना साधारणपणे दिवंगत व्यक्तींची नावे देण्याची पद्धत आहे; पण प्रा.रावांच्या हयातीतच आणि त्यांच्याच हस्ते त्या बागेचे नामकरण त्यांच्याच नावे व्हावे, हा अपवादच म्हणावा लागेल.

भारतीय वैज्ञानिकांच्या वर्तुळात प्रा.रावांनंतर होणारे दुसरे नाव रघुनाथ माशेलकर यांचे. डॉ.माशेलकर हे कौन्सिल फॉर सायन्टिफिक ॲण्ड इंडस्ट्रियल रिसर्च या संस्थेचे भूतपूर्व सरसंचालक (डायरेक्टर जनरल) आहेत, रॉयल सोसायटीची फेलोशिप त्यांच्या नावे आहे आणि अशी अनेक सन्मानदर्शक आभूषणे त्यांच्याजवळ आहेत. माझ्या माहितीप्रमाणे त्यांच्या नावाने अद्यापपर्यंत कोणत्याही इमारतीची उभारणी झालेली नाही किंवा एखाद्या चौकाचे नामकरणही झालेले नाही. पण 'करंट सायन्स' या नियतकालिकाच्या अलीकडच्याच अंकात त्यांनी संपादकीय जागेत जो मजकूर लिहिला आहे, त्यातून त्यांची अहंता ठायी-ठायी प्रकट झाली आहे. 'इनोव्हेशन' फॉर अफोर्डेबल एक्सलन्स' या शीर्षकाचा तो लेख फक्त माशेलकर आणि माशेलकरांबद्दलच सांगणारा आहे. त्या नियतकालिकाच्या फक्त दोन पानांमध्ये माशेलकरांच्या हार्वर्ड बिझिनेस रिव्ह्यूमध्ये जो लेख किंवा निबंध प्रसिद्ध झाला, त्याची माहिती आहे. त्या लेखाने जगभरच्या चर्चेला गती कशी मिळाली आहे आणि 'वर्ल्ड इकॉनॉमिक फोरम'चे त्या विषयावरील 'खास अधिवेशन' कसे गाजले याचा उल्लेख आहे. त्यांनी दिलेल्या एका टी.ई.डी. लेक्चरवर त्यांना पाच हजार प्रतिक्रिया मिळाल्या आणि तेवीस भाषांतून ते भाषण सबटायटल्ससह प्रसिद्ध झाले आहे; 'ग्लोबल अलायन्स' नावाच्या संस्थेचे डॉ.माशेलकर अध्यक्ष आहेत; युरोपियन संघराज्याने आमंत्रित करून दोन हजार श्रोत्यांपुढे त्यांना आपल्या विषयावर बोलायला लावले; ते जेव्हा सी.एस.आय.आर.चे डायरेक्टर जनरल होते, तेव्हा त्यांनी 'न्यू मिलेनियम इंडियन टेक्नॉलॉजी लीडरशिप इनिशिएटिव्ह' (नव्या सहस्रकातील भारतीय तंत्रविज्ञानाचे नेतृत्व प्रशिक्षण) अशा नावाने प्रस्थापित केलेल्या कार्यक्रमामागे 'पब्लिक-प्रायव्हेट पार्टनरशिप'चे तंत्र होते. माशेलकरांचा वरील लेख

विज्ञानाच्या गाभ्याशी आणि उद्दिष्टांशी इतका विसंगत होता की, तो प्रसिद्धीसाठी स्वीकारण्यात तरी कसा आला याचेच मला नवल वाटते. 'करंट सायन्स'च्या संपादकांनी त्यात काही आवश्यक काटछाट किंवा बदल केल्याशिवाय तो लेख छापला तरी कसा? एक तर तो संपादक अत्यंत अक्षम असावा किंवा ते माशेलकरांची कीर्ती आणि प्रतिष्ठा यांच्याखाली दबून जाऊन तो लेख दुरुस्त करण्याची सूचना करणे त्याने टाळले असावे.

'करंट सायन्स' हे नियतकालिक प्रख्यात शास्त्रज्ञ आणि नोबेल पारितोषिक विजेते सी.व्ही.रामन यांनी सुरू केले. त्यातील मजकुराचे स्वरूप अमेरिकेतील 'सायन्स' आणि ब्रिटन'धील 'नेचर' या दोन नियतकालिकांच्या धर्तीवरच आहे. त्यांच्याप्रमाणेच 'करंट सायन्स'मध्ये शास्त्रीय निबंधांच्या मूळ प्रती आणि त्यांच्यावरील छोटी टिपणे, ग्रंथ परीक्षणे आणि स्मृतिलेख किंवा श्रद्धांजली अशा स्वरूपाचे लिखाण प्रसिद्ध होते. पण 'सायन्स' किंवा 'नेचर' या नियतकालिकांमध्ये संपादकीयात अशा प्रकारच्या स्वयंस्तुतीने ओतप्रोत भरलेले लिखाण कधीच प्रसिद्ध होणार नाही. आपल्या लिखाणाला आकार देतानाआपण विकिपीडियाला ही स्वलिखित माहिती पुरवत नाही किंवा नोकरीसाठी एखादा अर्ज भरत नाही; तर एक अभ्यासपूर्ण लेखन करीत आहोत, जे राष्ट्रातील वैज्ञानिक जगताची ध्वजा फडकवीत ठेवणार आहे, याची जाणीव डॉ.माशेलकरांना नसेल का?

'करंट सायन्स'मधील डॉ.माशेलकरांचे संपादकीय वाचत असताना मला ब्रिटिश जीवशास्त्रज्ञ जे.बी.एस.हाल्डेन यांच्यासंबंधीच्या एका घटनेची आठवण झाली. हाल्डेन १९५० मध्ये भारतात आले. त्यांनी भारतीय नागरिकत्व पत्करले आणि कलकत्यात इंडियन स्टॅटिस्टिकल इन्स्टिट्यूटमध्ये त्यांनी एक प्रयोगशाळा उघडली. एकदा त्यांच्या एका विद्यार्थ्याने त्यांना स्वत:ची हकिगत ते कंटाळेपर्यंत ऐकवली. त्यात त्याच्या कुटुंबाची कहाणी, त्याचे शैक्षणिक रेकॉर्ड, ठरवून थांबवलेला विवाह यांबद्दल तो इतका काही बोलला की, हाल्डेन यांनी हात वर करून त्याला थांबविले आणि ते म्हणाले, ''तू फक्त तुझ्याचविषयी बोलत राहिला आहेस, पण विज्ञानाला स्वारस्य आहे ते तुझ्या बाहेरील जगाबद्दल!''

सत्य असे आहे की, सर्वच भारतीय शास्त्रज्ञ डॉ.राव किंवा डॉ.माशेलकर यांच्यासारखे स्वत:ला मिरवून घेणारे अगर फुशारक्या मारणारे नसतात. माझ्या संपर्कातील बुद्धिमान आदर्श मित्रांपैकी ओबेद सिद्दिकी हे एक होते. त्यांनी नॅशनल सेंटर फॉर बायॉलॉजिकल रिसर्च या भारतातील नि:संशयपणे सर्वोच्च दर्जाच्या वैज्ञानिक प्रयोगशाळेची उभारणी केली. सिद्दिकींमध्ये बौद्धिक चमक आणि व्यक्तिगत वर्तनातील अचूकपणा किंवा संयम यांचा विलोभनीय संगम होता. त्यांनी त्या संस्थेसाठी उत्तम व सुयोग्य पार्श्वभूमीच्या तरुण वैज्ञानिकांची निवड केली आणि काही काळाने संस्था चालविण्याची जबाबदारी त्यांच्यावरच सोपवली. एन.सी.बी.एस.मध्ये म्हणजे त्याच संस्थेमध्ये त्यांनी एक प्रकारच्या मुक्त आणि आदर्शवादी वातावरणाची निर्मिती केली, जिथे कनिष्ठ पातळीवरचे वैज्ञानिक तरुण वरिष्ठांना बेधडकपणे आव्हान देऊ शकतात आणि जिथे 'सर', 'प्रोफेसर' अशा प्रकारच्या वरवरच्या आदरणीय पण मनात धाक निर्माण करणाऱ्या संबोधनांनाही फाटा देण्यात येतो. दुर्दैवाने या ओबेद सिद्दिकींच्या साच्यात बसणारे वैज्ञानिक या देशात फारसे नाहीत. सी.एन.आर.राव आणि डॉ.माशेलकर यांनी त्यांच्या तरुण वयात प्रथम दर्जाचे वैज्ञानिक संशोधन नि:संशयपणे केले; पण वैज्ञानिक नेतृत्व आपल्या मागील तरुण संशोधकांच्या स्वाधीन करण्याऐवजी त्यांनी स्वत:ला त्यातच दीर्घ काळ बुडवून घेऊन ते पोक्त झाले. त्यांनी आपली सत्ता आणि सत्तास्थाने दोन्ही बळकट केली. त्यातही

आणखी वाईट गोष्ट अशी की, निव्वळ भाटगिरी आणि खुशामत या दुर्गुणांना त्यांनी उत्तेजनच दिले. डॉ.राव यांनी त्यांच्या संस्थेसमोरील मैदानाला आपले नाव देण्यास दिलेली संमती हा त्याचाच पुरावा आहे.

आपल्या देशातील वैज्ञानिकांच्या मार्गावर समाजशास्त्रज्ञही चाललेले आहेतच. या संदर्भात समाजमनावर दबदबा असणाऱ्या जगदीश भगवती आणि अमर्त्य सेन या अर्थशास्त्रज्ञांचे वर्तन तपासून पाहणे आवश्यक आहे. सुशिक्षित भारतीय या दोघांना नावाने तर ओळखतातच, शिवाय आर्थिक धोरणांबाबत त्या दोघांमध्ये सतत चाललेले वादही लोकांना माहीत आहेत. भगवती हे खुल्या बाजारव्यवस्थेचे समर्थक व प्रचारक आहेत. परकीय गुंतवणूक आणि स्पर्धा यांना आपली अर्थव्यवस्था खुली असली पाहिजे, असा श्री.भगवती यांचा दावा आहे. सेन यांना विकासाइतकेच त्याचे वितरणही महत्त्वाचे वाटते आणि जनतेच्या संगोपनातील सरकारची भूमिका त्यांना अधिक जबाबदारीची वाटते. राजकीय प्रभावाच्या पातळीवर सोनिया गांधी आणि त्यांचे राष्ट्रीय सल्लागार मंडळ (ॲडव्हायझरी कौन्सिल) यांना अमर्त्य सेन जवळचे सल्लागार वाटत, तर नरेंद्र मोदींचा भगवतीवर अधिक भरवसा आहे.

या बौद्धिक आणि सैद्धांतिक मतभेदांमुळे भगवती आणि सेन हे एकमेकांचे कट्टर विरोधक म्हणून जगासमोर आले. पण या दोघांमध्ये एक समान गोष्ट अशी आहे की, दोघेही जिवंत असताना सी.एन.आर.राव या वैज्ञानिकाप्रमाणेच त्यांच्याही नावे काही गोष्टी सुरू करण्यात आल्या आहेत. भगवतींनी कोलंबिया विद्यापीठात अनेक वर्षे ज्ञानदान केले, त्याचे स्मारक आता राजकीय अर्थशास्त्र विभागात जगदीश भगवती अध्यासनाच्या (चेअर) रूपाने तिथे झाले आहे आणि त्याचा ताबा सध्या भगवतींचेच लेखन-सहकारी व वारसदार अरविंद पनगरिया यांनी घेतलेला आहे. दरम्यान, इंडियन कौन्सिल ऑफ सोशल सायन्स रिसर्च (भारतीय समाजविज्ञान संशोधन संस्था) या संस्थेने सर्वोत्कृष्टतेच्या निकषावर सुरू केलेले अमर्त्य सेन वार्षिक पुरस्कार त्यांच्याच अध्यक्षतेखाली वितरित करण्यात आले आहेत.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी ‘व्यक्तिपूजा ही लोकशाही मूल्यांना मारक आहे’ असा दिलेला इशारा सर्वांना माहीतच आहे. हा इशारा राजकीय क्षेत्राला जसा लागू आहे, तसाच किंवा त्याहूनही अधिक वैज्ञानिक क्षेत्राला लागू पडणारा आहे. ज्येष्ठ विद्वान मंडळी किंवा अभ्यासक यांच्याबद्दल आदर ठेवणे ही गोष्ट चांगलीच आहे; पण या आदराचे रूपांतर अतिनम्रतेत किंवा व्यक्तीबद्दलची गाढ श्रद्धा आणि चमत्काराच्या भावनेमध्ये होते, तेव्हा त्याचा परिणाम स्वतंत्र व मूलभूत विचारांच्या विकासाच्या आड येतो. म्हणूनच जागतिक क्रमवारीत भारतीय विद्यापीठे आणि संशोधन संस्था या यादीच्या तळाच्या जवळपास पोहोचलेल्या दिसतात. माझे या विषयावरचे हे स्तंभलेखन चालू असताना माझ्या एका मित्राने मला विचारले की, सी.एन.आर.राव यांच्याप्रमाणेच बंगलोरमध्ये अनिल कुंबळे या क्रिकेटपटूच्या नावाने एका चौकाचे नामकरण करण्यात आले तेव्हा तोही तिथे हजर होता, हे खरे का? ‘माहीत नाही’ हे उत्तर देताना मी पुढे म्हटले की, नैतिकतेच्या किंवा कलात्मकतेच्या कसोट्या - ज्या वैज्ञानिकांना आणि विद्वान मंडळींना लावल्या जातात, त्या - खेळाडूंना लागू पडत नाहीत. जगदीश भगवतींचे एक जवळचे मित्र आणि पूर्वीचे सहकारी रॉबर्ट सोलो हे सध्या जगातील एक सर्वश्रेष्ठ अर्थतज्ज्ञ मानले जातात. जेव्हा ते ‘मॅसॅच्युसेट्स इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी’ या संस्थेत शिकवत होते, तेव्हा त्यांच्या संस्थेत ‘रॉबर्ट सोलो चेअर इन पोलिटिकल इकॉनॉमी’ असे एखादे अध्यासन निर्माण करण्यात आले होते काय? अमर्त्य सेनप्रमाणेच केंब्रिजच्या ट्रिनिटी कॉलेजमध्ये सर्वोच्च पदावर मार्टिन रीझ हे खगोलशास्त्रज्ञही एके काळी होते, पण या असामान्य ब्रिटिश शास्त्रज्ञाने वैज्ञानिक प्रगल्भतेसाठी दर वर्षी ‘मार्टिन रीझ’ पुरस्कार दिले होते काय? या दोन्ही प्रश्नांची उत्तरे ‘नाही’ अशीच असावीत.

सी.एन.आर.राव, अमर्त्य सेन आणि जगदीश भगवती या तिघांनीही वेगवेगळ्या गोष्टींना त्यांचे नामकरण करण्यास परवानगी किंवा प्रोत्साहन दिले, यात त्यांनी बेकायदेशीर काही नाही; त्यात अनैतिकही काही नाही; पण हीन अभिरुची दर्शन आणि औचित्यभंग मात्र नक्कीच आहे. या सर्व गोष्टींच्या पार्श्वभूमीवर आता नरेंद्र मोदी आणि त्यांचे नाव विणलेला त्यांचा सूट याचा विचार केला, तर 'समानता' हा गाभा व रचना असलेल्या समाजात किंवा ज्या समाजात कलांचा आविष्कार सौम्य व संयमी असतो त्यात मोदींनी दाखविलेली अभिरूची अप्रस्तुतच आहे; पण ज्या देशात व्यक्तिपूजा सर्वत्र चालते, जिथे सामर्थ्य आणि कीर्ती लाभलेल्याची मुजोरी अमर्याद असते, त्या समाजात अशा प्रकारची औचित्यशून्य वागणूक अगदी सहज असते. म्हणून भारतातील थोर विद्वान आणि शास्त्रज्ञ स्वप्रतिमेच्या कौतुकात इतके उत्कटपणे पडलेले असतात; तेव्हा स्वत:च्या प्रयत्नांनी उभ्या राहिलेल्या, साधारण शिकलेल्या राजकीय नेत्याला त्याच गोष्टीबद्दल फार दूषणे देता होणार नाहीत.

(अनुवाद – कुमुद करकरे)

साप्ताहिक साधनाच्या सौजन्याने

weeklysadhana@gmail.com

●●●

# अंधश्रद्धेचं जोखड उतरवायचं हाय!

*शर्मिला कलगुटकर*

महिला श्रद्धा/अंधश्रद्धा आरोग्य

कर्मकांड, बुवाबाजी, देवदेवस्कीच्या अंधश्रद्धांत सर्वाधिक बळी जाते ती स्त्री. मात्र समाज व्यवस्थेने-कुटुंबाने लादलेलं परंपरेचं जोखड स्त्रिया आता झुगारून देत आहेत. सारासार विवेकबुद्धी बाजूला ठेवून भावनिक पेचामध्ये अडकलेल्या अनेकजणी अंधश्रद्धेची ही पाचर मोकळी करू पाहत आहेत... बदलाची नांदी सुरू झालीय!

'बयो हाती घे आता शब्दविचारांची पाटी,
सवाष्णेसंग आता भर एकल्या सखीचीबी ओटी...'

चंद्रपूरच्या ताराबाई आपल्या पहाडी आवाजात नवरा गेलेल्या बाईलाही मान द्यायला सांगतात. भाकरी थापणाऱ्या हातामध्ये पाटी-पुस्तक-अक्षर घ्या, असं मधाळपणे समजावतात. तेव्हा समोर जमलेल्या वस्त्यांमधल्या, पाड्यांमधल्या बायांमध्ये दबकी खुसफूस होते. पोरी-बाया एकमेकींना कोपरानं ढोसतात. 'काय बी सांगते म्हातारी', म्हणत पोरीबाळींच्या त्या गर्दीतून एकदोन फटकळ प्रश्न बाईवर येऊन आदळतात. पण ताराबाई बधत नाहीत. गाणीगोष्टी सांगून माहौल थोडा हलका करतात, नेटाने पुढचा 'डोस 'गळी उतरवतात...

बयो, समजून घे की आता कावळा शिवायाची गोष्ट..
त्या दिवसांत नाही तु वंगाळ, ना तुवा देवराया कोपिष्ट...

गर्दीमध्ये आता थोडी चहलपहल... कुजबुज. बाईंनी विचारलेला 'त्या' दिवसातला हा प्रश्न तिथल्या प्रत्येकीच्या जिव्हाळ्याचा. आस्थेचा. श्रद्धा-अंधश्रद्धेच्या डबक्यात हजारदा बुडवून काढणारा. त्या दिवसातही बाया पवित्र असतात, असं सांगतेय ताराबाई. गर्दीतल्या पोरीबाळी-बाया एकमेकींकडे सूचक पाहतात. हीच का ती ताराबाई सुनेला 'त्या' दिवसात वेगळं बसवणारी? पाचव्या दिवसानंतर अंगारे-धुपारे करून घर शुद्ध करून घेणारी! 'होय तीच मी ताराबाई', बाई तीरासारखं उत्तर देतात. ताराबाई साठीच्या. जळगावमध्ये जन्मलेल्या. आठ बहिणींमध्ये सगळ्यात थोरल्या. आई गेल्यानंतर या बहिणींची जबाबदारी पेलणाऱ्या ताराबाईने बाहेरच्या दिवसांत बाजूला बसण्याचा रिवाज घरादारातल्या प्रत्येक मुलीसुनांना अट्टहासाने, जाचाने पाळायला लावला. तिची चार बुकं शिकलेली सूनही 'त्या' दिवसांतल्या वेगळं राहण्याच्या, शिवाशिवीच्या जाचातून सुटली नाही. मात्र फारशी लिखापढी माहीत नसली, तरी व्यवहारचातुर्य असलेल्या ताराबाईला नव्या सुनेनं 'त्या' दिवसांतलं खरं शास्त्रकारण पटवून दिलं. अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या एका कार्यक्रमामध्ये सुनेनं ताराबाईंना नेलं अन् साठीच्या ताराबाईने नाठी बुद्धी सोडून दिली. वयात आलेल्या, उमलणाऱ्या मुलींना 'त्या' पाच दिवसांतला डोळस उत्सव समजावून सांगण्यासाठी ताराबाई गावोगावी जाऊ लागली...सॅनेटरी नॅपकिन्स बनवण्याचा लघुउद्योग गावात यायला हवा, म्हणून बाईंनी गावागावात जाऊन जुने कपडे गोळा करण्याचं व्रत घेतलं. विवेकी बदलाची एक नवी झळाळी घेऊन ती तरुणींशी संवाद साधू लागली...

मुंबईत कुर्ल्याला पांढरीबाबाचा दरबार भरायचा. त्या दरबाराला शालिनीताई आणि त्यांची अठ्ठावीस वर्षांची लग्नाळू पोरगी जायची. बाबाने पोरीचं लग्न होईल, असं सांगून होमहवन करायला लावले, पशुबळी द्यायला लावले. सोन्याच्या काही गोष्टी भेट म्हणून मागितल्या. लग्नाळू पोरीसकट शालिनीने या सगळ्या मागण्या पूर्ण केल्या. दोन वर्षं झाली तरी स्थळ काही येत नव्हतं. मुलीला एक दिवस मठीवरच ठेवून जा, काम शंभर टक्के होईल, असं बाबाने सांगितल्यावर शालिनी सावध झाली. तिने पोलिसांची मदत घेऊन या बाबाची पोल खोलली. असलेलं नसलेलं गहाण टाकून विकून शालिनीने या बाबाकडे तीनेक लाख रुपये घालवले होते. आज हीच शालिनी पाटील शहरातल्या कष्टकरी वस्त्यांमधल्या स्त्रियांच्या, मुलींच्या मदतीला धावून जाते, बाबाबुवापासून दूर राहा, कष्टाची भाजीभाकरी कमावून खा, आयुष्याला निधडेपणाने भिडा, असं ठासून सांगते.

याच शहरात मुंबईतल्या रस्त्यावर राहणाऱ्या पारधी समाजातील कुटुंबामध्ये काम करणारी रजनी गोलानी. सेंट झेविअर्स महाविद्यालयाच्या सामाजिक संशोधन विभागामध्ये ही बाई काम करते. जेमतेम दहावी शिकलीय. मुलींनी शिकून काय करायचं, मुलगी जास्त शिकली की समाजाची प्रगती थांबलीच, या तिच्या समाजातल्या बुरसटलेल्या विचारामुळे तिच्या शिकण्याला पाचर बसली. पण शिक्षणानेच समाजाचा विकास होतो, हे सूत्र घेऊन ती आज मुंबईतल्या पारधी समाजातल्या कुटुंबामध्ये हिरीरिने काम करते. रस्त्यावर राहणाऱ्या या कुटुंबामध्ये प्रत्येकाला सातआठ मुलं. मुलं म्हणजे देवीची देन, ती नाकारायची नाही, असा प्रघातच. मुंबईतल्या पारधी समाजातल्या कुटुंबातल्या महिलांमधल्या आरोग्याशी निगडित असलेल्या अंधश्रद्धा दूर करण्यासाठी ती आता हिरीरिने काम करते. खरंतर मूल होऊ देणं हा कुटुंब वाढवण्यासाठीचा स्त्री-पुरुषाने घेतलेला एकत्रित निर्णय. त्यात देवीची देन कशी भाऊ?

असं रजनी गोलानी पारधी समाजातल्या कुटुंबाना विचारते. त्याच्या बदल्यात तिच्या तोंडावर कधी गटारातलं पाणी फेकलं जातं, तर कधी तिला मारही पडतो. तरीही पारधी समाजातल्या अनेकींना ती नायर हॉस्पिटलमध्ये घेऊन जाते. कुटुंब नियोजनाच्या शस्त्रक्रियेचं महत्त्व समजावून देण्यासाठी डॉक्टरांकडून समुपदेशनही करते. भटक्या विमुक्त समाजातल्या मुलींच्या शिक्षणासाठी धडपडतेही. या बेघर कुटुंबासोबत शिक्षणाचा वसा पुढे नेण्याचं विधायक काम करून रजनी शिक्षण सोडण्याची केलेली चूक दुरुस्त करतेय.

कराडला राहणारी बाली. लांबसडक केसांची. कामाच्या रेट्यामध्ये केसांना तेलपाणी विसरून गेलेली. केसांमधल्या गुंत्याचा गठ्ठा झाला, त्यात बुरशी वाढत गेली. बालीच्या केसांमधल्या या धुळ-कचऱ्याच्या गठ्ठ्यांमध्ये तिच्या सासूलाच कधीतरी जट सापडली. तिनेच गावात बोंब ठोकली- बाली जटावाली देवी झाली. तो सतराएक किलोचा केसांचा गठ्ठा पाठीवर वाहून बालीची मान ओझ्याने दबून गेली. ती डुगडुगत राहायची. डोळे गरगर फिरत राहायचे. काटकुळ्या बालीला डोक्यावरचं हे ओझं कसं उतरवायचं ठाऊक नव्हतं. पुढे लोकांची गर्दी वाढली, दर्शनाला लोक आले की बाली घुमायला लागायची, भलत्याच भाषेत बोलायची, पुन्हा शुद्धीवर आली की गपगार पडून राहायची. लोक म्हणायचे, बालीमध्ये देवीचं अधिष्ठान आहे. बालीलाही ते खरं वाटायचं, ती लोकांना उपदेश करायची, अंगारे धुपारे द्यायची. पुढं कराडच्या एन. एम. रॉय औपचारिक शिक्षणसंस्थेच्या व संशोधनकेंद्रातल्या लोकांच्या मदतीने बालीच्या जटा खाली उतरवण्यात आल्या. ती माणसात आली. आता जटेच्या ओझ्याखाली गुदमरून दबून गेलेल्या तिच्यासारख्याच अनेकींना ती आज समजावून सांगते- 'केसांचा गुंता काढा, मनाचा गुंता काढा. जट काढली म्हंजे ना देवीचा कोप होत, ना कुणाचे हात झडत. झालंच तर परत एकदा स्वतःच्या नजरेला नजर भिडवून उभं राहता येतं.'

अंधश्रद्धेच्या गुंत्यातून मोकळ्या होणाऱ्या ताराबाई, शालनाताई, बालीसारख्या अनेकजणी आता पुढे येऊ लागल्या आहेत. मोकळेपणाने व्यक्त होऊ लागल्या आहेत. कधी 'अंनिस'सारख्या चळवळीचा हात धरून त्या पुढे येतात, मोकळेपणाने व्यक्त होतात. तर कधी, कौमार्याची परीक्षा द्यायला लावणाऱ्या कंजारभाट समाजातल्या तरुण मुली 'सखी'च्या माध्यमातून अकरा रुपयांत लग्न करण्याची योजना यशस्वी व्हावी म्हणून धडपडत आहेत. वैदु विकास समाज समितीमधल्या मुलीही मुंबईतल्या प्रत्येक वस्त्यांमध्ये, अंधश्रद्धा तोडून समाजाला विकासाकडे नेणारे कार्यकर्ते तयार करण्याच्या कामाला जुंपल्या आहेत. वर्षोनुवर्षे अंधश्रद्धेच्या वाहक म्हणून काम करणाऱ्या या स्त्रियांना यापूर्वी या अंधश्रद्धा म्हणजे जगण्यासाठी आवश्यक असेलल्या श्रद्धाच वाटत होत्या! अंधश्रद्धेला उत्तेजन देणारी ही व्यवस्था आपलं शोषण करतेय हे अनेकींना कधी जाणवलंही नाही.

लग्न होऊन सासरी गेल्यानंतर घरात एखादी दुर्दैवी घटना घडली, तर त्याचं खापर पांढऱ्या पायाची मानून नव्या नवरीवर फोडलं गेलं, तेही त्यांनी गुमान स्वीकारलं. मात्र पांढऱ्या पायांच्या पुरुषाचा शोध घेण्याची सोय तिला व्यवस्थेने ठेवली नव्हती. आयुष्यावर लादलेलं अंधश्रद्धेचं हे जोखड मुळात निर्माण कुठून झालं, याचा शोध घेण्याइतकी उसंतही स्त्रियांना व्यवस्थेने दिली नाही. श्रद्धा आणि अंधश्रद्धा यांच्या झगड्यामध्ये अडकलेल्यांना विचारांचा कौल मान्य असतो, पण आचारांमध्ये तो उमटत नाही. अंधश्रद्धाळू बनलेल्या स्त्रियांमधील अगतिकता ही कुटुंबाने, समाजाने लादलेल्या वर्चस्ववादामध्येच असते. परिणामी कित्येक जणी आपलं शोषण म्हणजे जनरीतच असल्याचं धरुन चालतात.

वैद्यकीय संशोधन सांगतं की, स्त्रिया पुरुषांपेक्षा जास्त जगतात. कुठल्याही वयात गंभीर आजारानं मरण्याचं प्रमाण पुरुषांमध्ये जास्त आहे. मात्र गंभीर नसणारे परंतु सतत आजारी पाडणारे घटक स्त्रियांना सतत कुठल्या ना कुठल्या शारीरिक आणि मानसिक तक्रारींमध्ये अडकवत असतात. याचं कारण म्हणजे त्यांच्या मेंदूतल्या आणि शरीरातल्या हॉर्मोन्समध्ये सतत होणारे चढ-उतार. मासिक पाळी येताना, ती आल्यानंतर प्रत्येक मासिक पाळीच्या वेळी, गरोदरपणात, प्रसूतीत, गर्भपात करण्याची वेळ आल्यास, कुटुंबनियोजनाच्या किंवा गर्भाशयाच्या शस्त्रक्रियेनंतर आणि पाळी जाताना स्त्रियांमध्ये शारीरिक तक्रारींबरोबरच मानसिक तक्रारी निर्माण होत असतात. पर्यायाने अस्वस्थता, बेचैनी, उदासपणा, चिडचिडेपणा येतो; गैरसमजाची किंवा संशयाची भावना निर्माण होऊ शकते. अशा वेळी तीव्र नैराश्य, आत्महत्येच्या प्रवृत्तीदेखील स्त्रियांमध्ये असतात, त्यातून सुटण्यासाठी अंधश्रद्धेच्या गर्तेत लोटल्या जाणाऱ्या स्त्रियांची संख्या वेगाने वाढते आहे. सामाजिक आणि कौटुंबिक व्यवस्थेने लादलेली असहाय्यता सहन करणाऱ्या अनेक स्त्रिया पूर्वी या मानसिक आजारपणामध्ये अंगारे-धुपाऱ्यांचा इलाज करत संसार रेटत होत्या. स्वतःच्या मानसिक, शारीरिक आणि कौटुंबिक समस्या कर्मकांड, अंधश्रद्धा जोपासून सोडवू पाहत होत्या. मात्र देव-धुपारे, अंगात येणं हे थोतांड नसून ही मानसिक तणावाचा निचरा करण्यासाठीची स्वसंमोहन अवस्था असते, हे शास्त्रकारण आता स्वीकारलं जात आहे. तासन् तास घुमणं, शारीरिक वेदना न जाणवणं, अनोळखी भाषा बोलणं, याचा संबध मेंदूतील रासायनिक स्रावाची कमतरता, असह्य मानसिक ताणामधून निर्माण झालेल्या आजाराशी असतो, हे स्वीकारण्याचं धाडस आता ग्रामीण स्त्रियांमध्येही येऊ लागलं आहे. जातपंचायतीमध्ये स्त्रीच्या लैंगिक वर्तनावर ठेवलेले कडक निर्बंध झुगारून पंचांची मक्तेदारी मोडणाऱ्या स्त्रिया आता कुटुंब, संसाराच्या उद्धारासाठी जोपासलेल्या कर्मकांडांना, अंधश्रद्धांनाही फाटा देत असल्याचं निरीक्षण प्रबोधन चळवळीमधील कार्यकर्ते आता आवर्जून नोंदवतात.

आपल्या मानसिक-शारीरिक समस्यांविषयी व्यक्त व्हायला हवं, बोलायला हवं, त्यातून मार्ग काढायला हवा, म्हणणारी स्त्री आज या झगड्यात स्वतःला शोधू पाहतेय. व्यवस्था, जातींतून निर्माण झालेल्या अंधश्रद्धांची ओझी स्वतःच्या मुलीवर लादली जाऊ नयेत, यासाठी दक्ष राहणाऱ्या महिलांची संख्याही वाढते आहे. गावागावांमध्ये होणाऱ्या सोप्या विज्ञानवादी कार्यक्रमांमधून ग्रामीण भागातील स्त्रियांसह वयात येणाऱ्या मुलींचा सहभागही आश्वासक आहे. हा संघर्ष तितका सोपा नाहीये. पण प्रतिकूल परिस्थितीमध्ये असुरक्षित वातावरणातल्या, सामाजिक आर्थिक विवंचनेमध्ये असलेल्या स्त्रिया ही तारेवरची कसरत पार पाडत आहेत. स्त्रियांना नवं आत्मभान देणारा हा संघर्ष आहे. अर्थात त्याला असलेली विरोधाची धारही तितकीच तीव्र आहे. त्यातून पुढे जात अंधश्रद्धमुक्त स्त्री कोणती समाजव्यवस्था आणते, याकडेही हजार नजरा रोखलेल्या आहेत, हेही आपण ध्यानात ठेवायलाच हवं!

'महाराष्ट्र टाइम्स'च्या सौजन्याने

●●●

# अस्वस्थ नाट्यकर्मीचे प्रगल्भ चिंतन

*उदय कुलकर्णी*

परीक्षण चळवळ

अतुल पेंठे हे नाटककार, दिग्दर्शक, अभिनेता, संयोजक अशा विविध अंगाने तीस वर्षांहून अधिक काळ नाट्यक्षेत्रात कार्यरत आहेत .एक गंभीर, प्रयोगशील रंगकर्मी असा त्यांचा सार्थ लौकीक आहे .‘नाटकवाल्याचे प्रयोग’ हे त्यांचे पुस्तक म्हणजे त्यांनी वेळोवेळी लिहिलेले लेख, भाषणे आणि त्यांच्या मुलाखती यांचे संकलन आहे .एका विचारी रंगकर्मीच्या धारणा, चिंतन, त्याच्या प्रवासात या सगळ्यात होत गेलेले बदल, त्याला आलेले अनुभव, यावर पुस्तकातून स्पष्ट प्रकाश पडतो .वेगळ्या वाटेवरच्या नाटकाचे अर्थकारण काय याची कल्पना येते आणि अनपेक्षिपणे ग्रामीण दारिद्र्यायाबाबत चटका लावणारे वाचायला मिळते .हा लेख अतिशय अस्वस्थ करणारा आहे, त्याविषयी पुढे .

आतला आवाज या पहिल्याच लेखात अतुल पेंठे यांनी म्हटले आहे, मी समाजवादी किंवा डाव्या विचारसरणीचा कार्यकर्ता नाही, पण जी नाटके केली त्यामागे निश्चितच काही हेतू होते आणि ती नाटकं करताना अनेक विचारधारा समजून घेतल्या .घाशीराम कोतवाल, महानिर्वाण करताना ब्राम्हण्य, हिंदू धर्म, हुकूमशाही या विषयांबाबत जाण निर्माण झाली .सूर्य पाहिलेला माणूस आणि आनंदओवरी करताना सत्य, सदाचरण, सविनय कायदेभंग यावर विचार केला .इतर काही नाटकं करताना गुंतागुंतीची सामाजिक परिस्थिती मनात होती .यातच त्यांनी एक सुंदर भाष्य केले आहे, जग उमजणे म्हणजे आपल्यालाच आपण किती मूर्ख व अडाणी आहोत ते कळत जाणे .पेंठेंनी सुरवातीच्या काळात गोदो केले .चेस नावाची रॅगिंगवरची एकांकिका केली .क्षितिज नावाची एकांकिका त्यांनी लिहिली आणि केली त्याविषयी ते लिहितात, हे नाटक व्यक्तिगत अनुभवांवर होते, त्यात रागाचे, भितीचे, न्यूनगंडाचे आणि दु:खाचे भयप्रद दर्शन होते .ते नाटक मध्यमवर्गीय संकुचित मूल्यव्यस्थेत होणार्या :घुसमटीविषयी होते .श्याम मनोहर यांच्या शीतयुध्द सदानंद या कादंबरीचे पेंठेंनी नाट्यरुपांतर केले .त्याचे त्यांनी प्रथम १९८९ साली प्रयोग केले नंतर पुन्हा १९९२ साली केले .दरम्यान या तीन वर्षात राजकीय, सामाजिक परिस्थिती बदललेली होती .बाबरी मशीद पाडली गेली, राजकारणात दादागिरी वाढली .पेंठे लिहितात, मध्यमवर्ग आणि गुंडगिरी असले भयानक मिश्रण होण्याची ती सुरवात होती .त्यामुळे १९८९चा प्रयोग हा मध्यमवर्गीय इनोसन्स दाखवणारा होता तर १९९२चा व्हॉयोलन्स दाखवणारा , प्रायोगिक नाटक म्हणजे काय यावर अधूनमधून चर्चा होत असते .त्याबाबत पेंठे लिहितात, जगण्यातले अत्यंत गुंतागुंतीचे, व्यामिश्र आणि मूलभूत प्रश्न समजावून घेणे म्हणजे प्रायोगिक नाटक होय .

पुस्तकाचे सहा विभाग आहेत .त्यातील पहिल्याच विभागात मी केलेले प्रयोग हा लेख आहे .त्यात त्यांनी जी नाटके केली, माहितीपट बनवले, कोसलाचे आकाशवाणीवर वाचन केले या सर्वांचा उहापोह केला आहे .उजळल्या दिशा हे डॉ.सदानंद मोरेंचे दलित चळवळीचा वेध घेणारे नाटक त्यांनी केले .या व त्याआधी ‘प्रेमाची गोष्ट? ’ या नाटकाचे प्रयोगही ते करु शकले .दिग्दर्शकाचे ‘जॉब प्रोफाईल’ काय असा प्रश्न प्रेक्षकांच्या मनात असतो .पेंठेंनी त्याचे सविस्तर उत्तर दिले आहे .त्यांनी खुलेपणाने म्हटले आहे की, नाटक करताना अनेक बाजूनी व सखोल विचार केलेला असला तरी न कळलेल्या काही बाजू उरतातच आणि प्रयोगानंतर नाटकावर जी चर्चा होते त्यातून स्वत:ला न कळलेले

राजकारण समोर येते .चेस, क्षितिज अशी व्यक्तिगत अनुभवावरंची नाटके त्यांनी सुरवातीला केली, तेच तीस वर्षात बदल होत नंतर त्यांनी दलपतसिंग येती गावा, सत्यशोधक अशी सामाजिक विषयांवरची नाटके केली .व्यक्तीकडून समष्टीकडे असा त्यांचा प्रवास झाला .त्यातही समाजाला पुढे नेणारे विचार देणारी आणि शोषितवर्गाची नाटके त्यांनी केली .इतकेच नाही तर नेहमीचे कलाकार न घेता सफाई कामगार, शेतकरी या वर्गातील व्यक्तींना बरोबर घेऊन, त्यांच्या कार्यशाळा घेऊन ही नाटके केली.

राजकुमार तांगडे व संभाजी तांगडे हे जालना जिल्ह्यातील जांबसमर्थ या गावाचे नाट्यकर्मी .त्यांच्या आग्रहावरुन अतुल पेठे हे नवे नाटक करण्याकरिता जांबसमर्थला गेले .तिथलेच नाट्यप्रेमी लोक घ्यायचे, त्यांच्या समवेत कार्यशाळा घ्यायची व नाटक करायचे अशी कल्पना होती .ग्रामीण दारिद्र्य याची सर्वांनाच थोडीफार कल्पना असते, तशी पेठेंनाही होती, पण प्रत्यक्षात तिथे गेल्यावर परिस्थिती किती भीषण आहे ते त्यांना कळले .वाचतानाही आपली तीच स्थिती असते .रोजच्या जेवणाची गोष्ट घ्या .पूर्ण जेवण बहुसंख्य घरात नसतेच .भाकरी आणि चटणी किंवा भाजी इतकाच आहार .बाहेरचा एक माणूस येऊन जेवणार म्हणजे त्या घरावर ताण .घरातील चुली आणि त्यांचा धूर पाहून पेठेंना या बायका किती धूर फुफुस्सात शोषत असतील या विचाराने खूप त्रास झाला .संडासासारखी प्राथमिक आणि आवश्यक गोष्टही गावात नाही .प्यायला पाणी मिळतं ते जड आणि वाईट .रात्री कधीतरी वीज आल्यावर पहाटे पाचपर्यंत शेतावर पाणी द्यायला जायचं .शहरातील माणसाची राजकारण आणि राजकीय व्यक्ती यांच्याशी संपूर्ण फारकत असते .गावात मात्र दैनंदिन जगण्यात राजकारण मिसळलेले असते .ऊस विकला जावा असे वाटत असेल तर गाव पुढार्यांच्या सभांना जावचं लागतं, परिसरातल्या नव्या सरंजामदाराला शरण जावंच लागतं .नाटकात काम करण्यासाठी ते गावातीलच मुलींचा शोध घेत होते .मुलींबाबत तर शंभर वर्षांपूर्वीची परिस्थिती आहे असं त्यांच्या लक्षात आलं .हुंडा द्यावा लागतो, त्यासाठी कर्ज घ्यावं लागतं .गावात बुवाबाजी आहे, जातीपातीचे प्रश्न आहेत . जगण्याचे प्रश्न असे भीषण आणि काय नाटक करणार? या सगळ्याचा पेठेंना भयंकर भावनिक - मानसिक त्रास झाला . इतकी हलाखीची स्थिती बघून त्यांना कळेना आपण तिथे कशासाठी गेलो आहोत, नाटक करण्यासाठी की समाज बदलण्यासाठी? या त्रासातून मार्ग काढत, कार्यशाळा घेत त्यातून दलपतसिंग येती गावा हे नाटक आकाराला आलं . एलकुंचवारांच्या पार्टी नाटकातील एक पात्र म्हणते, चांगले लिहिण्यासाठी लेखकाच्या मनात करुणा हवी म्हटले जाते, पण ही करुणा जर त्याच्या व्यक्तिमत्त्वाचा भाग झाली तर तो कलावंत केवळ कलाकृतीपुरता मर्यादीत कसा राहील? पेठेंचा त्रास बघून त्याचे प्रत्यंतर येते.

सत्यशोधक हे नाटककार गो.पु.देशपांडे यांचे जोतिबांच्या जीवनावरील नाटक .पुणे मनपांच्या कामगारांना - सफाई कर्मचाऱ्यांना घेऊन अतुल पेठे यांनी हे केले .ते बघणे हा एक सुंदर अनुभव आहे .त्याआधी त्यांनी त्यांच्याबरोबरच कचरा-कोंडी हा माहितीपट केला होता, त्यातून नाटक करण्याची कल्पना पुढे आली .इथेही कामगारांना घेऊन जेव्हा ते नाटक बसवायला लागले तेव्हाही अस्वस्थ करणारा अनुभव त्यांना आला .ते लिहितात, गरिबीचे अनेक स्तर असतात याची जाणीव झाली, एका जागी बसणं, काही वेळ नीटपणे ऐकणं, त्यावर विचार करणं, ते लक्षात ठेवणं हे या कामगारांना शक्यच होत नाही .'आत्ता आणि इथं' एवढ्यापुरतंच जगणं होऊन जातं .पेठे म्हणतात, दारिद्र्य म्हणजे आर्थिक कमतरता यावरच लक्ष असतं, पण पैशाच्या अभावी सामाजिक, शैक्षणिक, आरोग्यविषयक आणि सांस्कृतिक

या सगळ्याबाबतीच दारिद्र्य असते हे आपण लक्षात घेत नाही .या सगळ्यांशी मुकाबला करत हे इतके प्रभावी नाटक तयार झाले .

डॉ .नरेंद्र दाभोलकर आणि अतुल पेठे यांचे जवळचे संबंध होते .डॉ .नरेंद्र दाभोलकर यांच्या खुनानंतर पेठेंनी अंनिसच्या कार्यकर्त्यांबरोबर कार्यशाळा घेतल्या आणि रिंगण हे पथनाटक सादर केले, त्याचा वृत्तांत पुस्तकात सविस्तर आलेला आहे.

अतुल पेठेंना ही नाटके आणि त्याचे प्रयोग करताना आर्थिक बाजूही बारकाईने लक्ष देऊन सांभाळावी लागली . काही वाईट अनुभव आले तसेच चांगले अनुभवही आले .अनेकांनी स्वतःहून मदत केली .तरिही आर्थिक जमवाजमव करण्याचा ताणही त्यांना सोसावा लागलाच, केवळ नाटक ऊभे करताना नाही तर प्रत्येक प्रयोगाच्यावेळी आर्थिक प्रश्न असायचाच .कलाकार नसलेल्या लोकांना घेऊन, जीवतोड मेहनत करुन ते चांगली नाटके देतात .निदान त्यांना आर्थिक बाबतीत तरी ताण येणार नाही यसाठी समाजानेच पुढे यावे ही अपेक्षा .

**"नाटकवाल्याचे प्रयोग"**
अतुल पेठे
मनोविकास प्रकाशन ,
पृष्ठे २१६, मूल्य रू.२२०-/

महाराष्ट्र टाइम्सच्या सौजन्याने

kuluday@rediffmail.com

•••

# जुने ते सोने (?)

## *भालचन्द्र काळीकर*

श्रद्धा/अंधश्रद्धा विवेक

पुराणमित्येव न साधु सर्वम् (जुने ते सर्वच चांगले असते असे नाही.) असे कविकुलगुरु कालिदास दोन हजार वर्षांपूर्वी सांगून गेला आहे. परंतु आमच्या पुराणप्रिय समाजाच्या काही ते पचनी पडले नाही. उलट एखादी गोष्ट जितकी जुनी तितकी ह्या समाजाला जास्त प्रिय असते. काळाची पुटे चढून ती जेवढी अंधुक होईल तेवढी ती आम्हाला अधिक आकर्षक वाटते. निराधार परंपरांवर डोळे मिटन विश्वास ठेवलण्यात आम्हाला अतिशय आनंद वाटतो. प्राचीन काळापासून रूढ झालेली गृहीतके हे आमचे आवडते विचारधन आहे. कुठलीही प्रायोगिक सिद्धता न लाभलेल्या गूढ, गहन, अनाकलनीय, धूसर अशा गोष्टींचे विलक्षण आकर्षण आमच्या समाजाला असते .सुबोधतेपेक्षा दुर्बोधतेकडे ओढा असणे, स्पष्टतेपक्षा धूसरता अधिक आवडणे, प्रकाशापेक्षा अंधार बरा वाटणे,ज्ञानापेक्षा अज्ञानात सुख वाटणे, आकाराऐवजी निराकारात रमावेसे वाटणे हा वैचारिक जगतातील फार मोठा विरोधाभास आहे.

ह्या विरोधाभासाला आणखी एका विचित्र विरोधाभासाची जोड लाभली आहे .आकर्षण जुन्याचे पण उपभोग मात्र नवीनाचा असा ह्या साजाचा विलक्षण स्वभाव बनला आहे.आधुनिक विज्ञानाने उपलब्ध करून दिलेली सर्व सुखे,

सर्व सुविधा आम्हाला हव्याहव्याशा वाटतात. कौतुक मात्र जुन्याचे होत असते. शरीर आधुनिक समृधींमध्ये लोळत असते, मन मात्र जुन्या काळात रेंगाळत असते. अर्वाचीन वैद्यकाने शोधून दिलेल्या उपचारपद्धतीचा हक्काने लाभ घ्यायचा पण तिलाच नाके मुरडत गोडवे मात्र आयुर्वेदाचे गायचे अशी पुराणमतवाद्यांची पद्धत आहे .आधुनिक चिकित्सकांनी सुचविलेल्या सर्व चाचण्या धावत जाऊन करून घ्यायच्या, एवढेच व्हे तर आणखी करण्यासाठी गळ घालायची पण गोडवे मात्र जुन्या वैद्याच्या  नाडीपरीक्षेचे' गायचे अशी रीत जुन्याच्या अभिमान्यांची असते. डॉक्टरांकडून आजार बरे करून घ्यायचे पण श्रेय मात्र नवसाला पावलेल्या (?) देवाला किंवा केलेल्या ग्रहशांतीला द्यायचे त्यांचा खाक्या असतो.

अशा विसंगतींचे मूळ विवेकाच्या संपूर्ण अभावामध्ये सापडते .विवेकाची जर कास धरली, तर निखळ असा वैज्ञानिक  दृष्टिकोन अंगी बाणतो व हया विसगती आपल्या आपल्यालाच हास्यास्पद वाटू लागतात .पण हा दृष्टिकोन समाजाला लाभणे मात्र महत्त्वाचे आहे .अनेक बुद्धिप्रामाण्यवादी ह्यासाठी जिवाचे रान करून झटत आहेत .त्यांच्या प्रयत्नांना यश लाभो हीच सदिच्छा .पण ही इच्छा फळणे वाटते तेवढे सोपे नाही .कारण, एखाद्याची मूळची दृष्टी चांगली असेल व तिच्यात काही दोष निर्माण झाला असेल तर त्यावर उपचार करता योतात .परंतु कितीही मोठा नेत्रविशारद असला तरी तो जन्मांधाला दृष्टी देऊ शकत नाही.

bhalchandra.kalikar@gmail.com

●●●

# चर्चेसाठी.....

*सुभाष आठले*

कोणत्याही कुटुंबात मुलां-मुलींचा जन्म झाला की त्यांच्यावर त्यांच्या आई-वडिलांचा  किंवा दोघांपैकी एकाचा धर्म लादला जातो.  त्यावेळी त्यांची संमती घेण्याचा प्रश्नच नसतो.   म्हणजे त्यांच्यावर जबरदस्तीने धर्म लादला  असेच म्हणावे लागेल.  एखाद्यावर  जबरदस्तीने धर्म लादणे हा गुन्हा नाही काय?  सोळा वर्षाखाली  माणसाला विचारपूर्वक निर्णय घेण्याची क्षमता नसते असा कायदा आहे . म्हणूनच अशा मुलां-मुलींना त्यांनी केलेल्या गुन्ह्याबद्दल शिक्षा केली जात नाही,  किंवा १६ वर्षाखालील  मुलीशी लैंगिक संबंध तिच्या संमतीने ठेवला तरी तो बलात्कार समजला जातो.  तसेच, सोळा वर्षाखालील मुलां-मुलींनी विरोध केला नाही,  तक्रार केली नाही तरी,  त्याच्यावर कोणताही धर्म लादणे हा गंभीर गुन्हा समजला पाहिजे.  आपल्या घटनेतील विविध कायद्यांचा आणि मूलभूत अधिकारांचा मिळून असा अन्वयार्थ निघतो असे वाटते.  तसे असले तरी, सर्व पालकांवर असा  गुन्हा दाखल करणे प्रत्यक्षात अशक्य आहे,  हे आपण समजू शकतो.  पण शासनाने तरी आपल्या  दप्तरामध्ये सोळा वर्षाखालील मुला-मुलींच्या धर्माची दखल आणि नोंद घेऊ नये.  आणि शिक्षण संस्थांमधून मुलां-मुलींवर एकाच धर्माचे संस्कार होणार नाहीत असे पहावे. मुलां-मुलींना सर्व धर्मांची माहिती  सारखीच जोर देवून द्यावी. सोळा किंवा अठरा वर्षे पूर्ण झाल्यावर  ती व्यक्ती जो धर्म स्वीकारेल,  त्याच धर्माची नोंद करावी.  त्याची/तिची इच्छा तशी  असेल तर, निधर्मी  म्हणून नोंद करावी.
या  विषयावर  आपली मते  कळवावी.

subhashathale@gmail.com●●●